**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.१७०/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री योगेन्द्र राजेश्वर मोडक<br>द्वारा - अविनाश बी. सीडाम, जिल्हा परिषद कॉलनी,<br>क्वार्टर नं. डि/१५, कॉम्लेक्स, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली -४४२ ६०५ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता<br>जलविज्ञान प्रकल्प मंडळ (संकलन) नाशिक<br>जलविज्ञान भवन, दिंडोरी रोड, नाशिक - ४२२००४ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारि अभियंता<br>जलविज्ञान प्रकल्प विभाग, अमरावती<br>आयुक्त कार्यालय परिसर, अमरावती | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०२/०५/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जलविज्ञान प्रकल्प, अमरावती श्री व. ग. गोन्नाडे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता यांच्या तर्फे श्री दे. ना. बाविस्कर कार्यालयीन अधिक्षक हे हजर आहेत.

२.    अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखाली दि.१२/०७/२०१० च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जनसंपदा विभाग अमरावती यांच्याकडे  दि. १९/०२/१९७४ पासून दि.२७/०५/१९९७ या वर्षातील 'अ' ते 'क' अशी ६ मुद्यांमध्ये दिवंगत राजेश्वर गोमाजी मोडक, वरिष्ठ लिपीक यांची माहिती मागितलेली आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जलविज्ञन प्रकल्प विभाग अमरावती यांनी दि.१३/०८/२०१० च्या पत्रान्वये माहितीबाबत कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी अधिक्षक अभियंता, जलविज्ञान प्रकल्प मंडळ (संकलन) दिघोरी रोड नाशिक यांच्याकडे  दि. ३१/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.०१/११/२०१० रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांना  अपीलार्थीस विनामुल्य माहिती देण्याचे आदेश देण्यात आले. परंतू अपीलकर्ता यांना अपूर्ण माहिती मिळाली म्हणून त्यांनी दि.२५/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.    अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, दिवंगत राजेश्वर गोमाजी मोडक, वरिष्ठ लिपीक हे जलविज्ञान प्रकल्प अमरावती येथे कार्यरत होते. त्यानंतर शासनाच्या सेवेतून त्यांना सक्तीने सेवानिवृत्त करण्यात आले होते. सेवानिवृत्तीनंतर ते मय्यत झाले म्हणून त्यांचे पुत्र श्री योगेन्द्र मोडक यांनी कै. राजेश्वर मोडक यांचा गोपनीय अहवाल आणि त्यांचे प्रतिकुल शेरे इ. बाबतची माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडून दि. १३/०८/२०१० च्या पत्रान्वये माहिती प्राप्त झाली. सदर माहिती ही सन १९८४ ते १९९७ या कालावधीतील  प्राप्त झाली. मात्र सन १९७४ ते १९८४ या कालावधीतील माहिती प्राप्त झाली नाही  म्हणून अपूर्ण माहिती प्राप्त झाल्यामुळे त्यांनी अधिक्षक अभियंता यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही.

४.    जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री गोन्नाडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती काढण्यात आली.  आणि माहितीचे शुल्क रु. १६४/- भरण्याबाबत अपीलार्थीस दि. ०२/०८/२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले. त्याला अनुसरुन अपीलार्थीने माहितीचे शुल्क पाठविले आणि त्यानंतर दि. १३/०८/२०१० च्या पत्रान्वये त्यांच्या

कार्यालयाकडे दि. ०१/०४/१९८४ ते २७/०५/१९९७ पर्यंतचे उपलब्ध असलेल्या गोपनीय अहवालाच्या प्रती अपीलार्थीस पाठविण्यात आल्या मात्र सन १९७४ ते ३१/०३/१९८४ या कालावधीतील गोपनीय अहवाल त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नव्हते असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील अधीक्षक अभियंता, नाशिक यांच्याकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात जी माहिती जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध नसेल आणि ती ज्या कार्यालयाशी संबंधित असेल त्यांच्याशी पत्रव्यवहार करुन अपीलार्थीस विनामुल्य माहिती देण्याचे निर्देश दिले असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांचे वतीने उपस्थित असलेले कार्यालयीन अधिक्षक यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्यास सन १९८४ ते १९९७ या कालावधीच्या गोपनीय अहवालाच्या प्रती मिळाल्या आहेत. मात्र १९७४ ते १९८४ या कालावधीतील गोपनीय अहवालाच्या प्रती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही ही वस्तुस्थिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.१३/०८/२०१० च्या पत्रात कळविणे आवश्यक होते मात्र जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस याबाबत काहीही कळविलेले नाही. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी औरंगाबाद, चंद्रपूर, अमरावती या कार्यालयांना कळविले असून अपीलार्थीस सन १९७४ ते १९८४ या कालावधीच्या गोपनीय अहवालाच्या प्रती त्यांच्या कार्यालयात कै. राजेश्वर मोडक हे ज्या ज्यावेळी कार्यरत होते त्या-त्या प्रती अपीलार्थीस पुरविणे बाबत कळविलेले आहे. मात्र अपीलार्थीस अद्यापही माहिती प्राप्त झाली नाही असे अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले. म्हणून प्रस्तुत प्रकरणी आता जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी सन १९७४ ते १९८४ या कालावधीतील कै. मोडक ज्या ज्या कार्यालयात कार्यरत होते त्या कार्यालयाकडे पुन्हा पत्र व्यवहार करुन त्यांच्याकडून गोपनीय अहवालाच्या प्रती मागवाव्या व त्यांच्या कार्यालयाकडे गोपनीय अहवाल उपलब्ध नसतील तर तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे त्यांनी मागितलेली माहिती ज्या कार्यालयाशी संबंधीत आहे त्या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. तथापी त्या कार्यालयांकडे माहिती उपलब्ध नसल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १६८/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री उमाजी पांडुरंग पुनवटकर<br>C/o, शांताराम शिवरकर, ओम निवास, एटापल्ली रोड, आलापल्ली<br>ता. अहेरी जि. गडचिरोली | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी गडचिरोली<br>कॅम्पस एरिया, ता. जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य<br>औद्योगिक प्रशिक्षण संस्था, आलापल्ली<br>ता. अहेरी जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०२/०५/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आलापल्ली श्री सुभाष पेदापल्लीवार हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी श्री के. पी. बांते हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखाली दि. १२/१०/२०१० च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आलापल्ली ता. अहेरी जि. गडचिरोली यांच्याकडे श्री करंडे वरिष्ठ लिपीक यांच्याबाबत एप्रिल २००९ ते सप्टेंबर २०१० या कालावधीतील माहिती मागितलेली असून माहे सप्टेंबर २०१० च्या हजेरीपत्रकाची प्रत आणि श्री करंडे यांनी याच कालावधीतील घेतलेल्या कार्यालयीन आदेश (OD) च्या सत्यप्रती आणि प्रवासभत्ता देयक /LTC बिलानुसार घेतलेली रक्कम याची माहिती मागितलेली आहे. सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस विहीत  मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी गडचिरोली यांच्याकडे दि. १३/११/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.०९/१२/२०१० रोजी देण्यात आला असून अपीलार्थीस ०७ दिवसात माहिती पुरविण्याबाबत जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांना आदेश दिले. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.२५/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आलापल्ली ता. अहेरी जि. गडचिरोली यांचेकडे श्री करंडे वरिष्ठ लिपीक यांच्याबाबत माहिती मागितली होती. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी माहितीच्या अर्ज हा परिपूर्ण नमुन्यात नसल्यामुळे नस्ती करण्यात येत आहे आणि पुनश्च माहितीचा अर्ज सादर करण्याबाबत दि.०३/११/२०१० च्या पत्रान्वये कळविले त्यानुसार जोडपत्र अ नियमामध्येच दिले आहे तरी नमुन्यात अर्ज नसल्याचे सांगून माहिती दिली नाही असे अपीलार्थीने सांगितले. त्यानंतर प्रथम अपील दाखल केले मात्र प्रथम अपीलाच्या आदेशानंतरही माहिती मिळाली नाही तसेच जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य हे माहिती देण्यास टाळाटाळ करतात आणि प्रथम अपीलाच्या सुनावणीस संपूर्ण माहिती घेऊन जनमाहिती अधिकारी यांना बोलविण्यात आले होते मात्र त्यांनी कोणतीही माहिती सोबत आणली नाही. आणि विहीत नमुन्यात माहितीचा अर्ज नसल्याचे सांगितले आणि प्रथम अपीलाच्या आदेशानंतर माहिती उपलब्ध करुन दिली परंतू दिशाभूल करणारी व अपूर्ण माहिती दिली म्हणून जनमाहिती अधिकारी यांच्यावर दंडाची कार्यवाही करण्यात यावी असे अपीलार्थीने आयोगासमोर सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य श्री पेदापल्लीवार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. परंतू अपीलार्थीने माहितीचा अर्ज जोडपत्र अ नियम ३ नुसार भरलेला नाही त्यामुळे परिपूर्ण नसल्याकारणाने सदर अर्ज नस्ती करण्यात आला आणि अपीलार्थीस नियमाप्रमाणे माहितीचा अर्ज भरुन माहिती पुरविण्यात येईल असे नमूद करुन दि. ०३/११/२०१० च्या पत्रान्वये कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचेकडे दि. २७/१२/२०१० रोजी प्राप्त झाला. त्यानुसार अपीलार्थीस माहितीचे शुल्क भरण्यासाठी दि. २७/१२/२०१० रोजी पत्र दिले. अपीलार्थीने दि. ३१/१२/२०१० रोजी माहितीचे शुल्क रु. ७०/- चा भरणा केल्यानंतर अपीलार्थीस दि. ०४/०१/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सदर माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र श्री करंडे यांना सप्टेंबर १० मध्ये दि.१७/०९/२०१० आणि दि.१८/०९/२०१० रोजी ऑफीस डयुटीसाठी पाठविलेले आहे. त्यांच्या प्रती त्यांना उपलब्ध झाल्या नाहीत असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. जनमाहिती अधिकारी यांनी पुरविलेली प्रत आणि अपीलार्थीस प्राप्त झालेली माहिती याची आयोगासमोर खात्री केली त्यावेळी अपीलार्थीस दि. १७ आणि १८ सप्टेंबर २०१० च्या श्री करंडे यांच्या ऑफीस डयुटीच्या प्रती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती अर्जामध्ये त्यांना काही मुद्यांचे रकाने कोरे दिसून आले तथापी अपीलार्थीने मागितलेल्या माहितीबाबत स्पष्ट कल्पना येत असतांना पुन्हा सुधारीत नमुन्यात अर्ज करावा असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविणे योग्य नाही. कारण केवळ तांत्रीक चुका लक्षात घेऊन माहिती उपलब्ध करुन न देण्याची कृती ही समर्थनीय नाही. म्हणून भविष्यात जनमाहिती अधिकारी यांनी अशाप्रकारच्या तांत्रीक चुका लक्षात न घेता माहिती पुरविणे संयुक्तिक व योग्य होईल. तसेच अपीलार्थीस प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते मात्र अपीलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे दि. १७

आणि १८ सप्टेंबर २०१० च्या श्री करंडे यांच्या ऑफीस डयुटीच्या प्रती उपलब्ध झालेल्या नाहीत म्हणून सदर माहिती देखील अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य उपलब्ध करुन देणे योग्य राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी अपीलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे दि.१७/०९/२०१० आणि दि. १८/०९/२०१० च्या प्रती अपीलार्थीस विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्याव्या.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १६९/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री उमेश जी भारशंकर<br>मु. पो. अहेरी, चेरपल्ली रोड, कुंभार वार्ड क्र.५<br>ता. अहेरी जि. गडचिरोली | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक<br>सिरोंचा वनविभाग<br>ता. सिरोंचा जि. गडचिरोली. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्राधिकारी<br>कमलपूर, वनविभाग सिरोंचा<br>ता. अहेरी जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/०५/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २७/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२२/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी कमलपूर वनविभाग सिरोंचा श्री डी. एफ. दुर्गे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी श्री वाय. एम. भगत, हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखाली दि. २१/१०/२०१० च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, कमलपुर, वन विभाग सिरोंचा ता. अहेरी जि. गडचिरोली यांच्याकडे सन २०१० - २०१२ या

कालावधीतील श्री घेरकर वनसंरक्षक यांचे मूळ सेवा पुस्तकातील पहिल्या पानाची छायांकित प्रत तसेच श्री घेरकर वनसंरक्षक यांचे वारसान बाबतचे छांयाकित प्रती, जात वैधता प्रमाणपत्र, मार्कशिटची छायांकित प्रत नोकरीवर रुजू होतानांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश, त्यांच्या बदली व प्रवासभत्त्याच्या प्रती तसेच सन २००८ ते २०१० मध्ये जी कामे केली त्याची माहिती अशी एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, कमलपुर, वन विभाग सिरोंचा यांचेकडे श्री घेरकर वनसंरक्षक यांच्या बाबत मूळ सेवा पुस्तकातील पहिल्या पानाची छायांकित प्रत तसेच श्री घेरकर वनसंरक्षक यांचे वारसान बाबतचे छांयाकित प्रती, जात वैधता प्रमाणपत्र, मार्कशिटची छायांकित प्रत नोकरीवर रुजू होतानांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश, त्यांच्या बदली व प्रवासभत्त्याच्या प्रती, सन २००८ ते २०१० मध्ये जी कामे केली त्याची माहिती अशी माहिती मागितली होती. परंतू जनमाहिती अधिकारी यांचेकडून मागितलेली माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीस दि. ०४/०१/२०११ रोजी उपस्थित राहण्यासाठी पत्र निर्गमित करण्यात आले होते. परंतू सदर पत्र हे दि.०५/०१/२०११ मिळाल्यामुळे प्रथम अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहता आले नाही असे अपीलार्थीने सांगितले. तसेच जनमाहिती अधिकारी हे बुध्दीपुरस्पर माहिती देण्याचे टाळतात आणि विलंब करतात म्हणून त्यांच्याविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) प्रमाणे शास्तीची कार्यवाही करावी असेही अपीलार्थीने आयोगासमोर सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी श्री डी. एस. दुर्गे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२१/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. २७/१०/२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्यानुसार माहिती संकलीत करण्यात आली. अपीलार्थीने व्यक्तीशः माहिती मागितली होती परंतू ते माहिती घेण्यास कार्यालयात आले नाही त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी सदर माहिती प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय वन परिक्षेत्र अधिकारी अहेरी यांचेकडे दि. २२/१२/२०१० ला पाठविली आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.०७/०४/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने

मान्य केले. मात्र सदर माहिती ही विलंबाने उपलब्ध झाल्याबद्यल संबंधितांविरुध्द कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दि. २१/१०/२०१० चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाने दि. २७/१०/२०१० ला प्राप्त झाला अपीलार्थीने मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी तयार केल्यानंतर त्यांना ३० दिवसात माहिती घेऊन जाण्याबाबत लेखी पत्राद्वारे कळविणे आवश्यक होते. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस ३० दिवसांचे मुदतीत याबाबत काहीही कळविले नाही. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दि. २२/१२/२०१० च्या पत्रान्वये माहिती पाठविली. आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. ०७/०४/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. म्हणून विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिल्याबद्यल जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. या विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती संकलीत करण्यास विलंब लागला तसेच अपीलकर्ता हे व्यक्तीशः माहिती घेण्यास कार्यालयात आले नाही म्हणून अपीलार्थीस ३० दिवसात माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. जनमाहिती अधिकारी यांनी विलंबाबाबत केलेला खुलासा हा योग्य व समर्थनीय दिसून येत नाही. कारण माहितीच्या अधिकारान्वये ३० दिवसांचे मुदतीत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करणे आवश्यक होते मात्र तशी कार्यवाही केलेली नाही म्हणून त्यांनी केलेला खुलासा मान्य करण्यासारखा नाही म्हणून विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून ३० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून सदर विलंबास ते जबाबदार दिसून येतात. तसेच त्यांनी विलंबाबद्यल केलेला खुलासा मान्य करण्यासारखा नाही. त्यामुळे

जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २०(१) अन्वये रु. ५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

२. सदरच्या शास्तीची वसूली कार्यालयीन प्रमुखांनी जनमाहिती अधिकारी यांच्या दरमहाचे वेतनातून कपात करुन ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " जमा करावी.

३. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर त्यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिला नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) प्रमाणे त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडली नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याची पुनावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १७९/नाग/२०११, १८०/२०११, १८१/२०११, १८२/२०११, १८३/२०११, १८४/२०११, १८५/२०११, १८६/२०११, १८७/२०११, १८८/२०११, १८९/२०११, १९०/२०११, १९१/२०११, १९२/२०११.</u>**

१. श्री राजेश नवलकिशोर ठाकूर - **अपीलकर्ता**
रा. विशाखा निवास, अजय नगर, अंबाझरी हिल टॉप, नागपूर
ता. जि. नागपूर - ४४० ०३३

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय हिंगणा
ता. हिंगणा जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा संचालक (श्री सुखराम जानबाजी काचोरे) - **उत्तरवादी**
स्वस्त धान्य दुकानधारक, वडधामना
ता. हिंगणा जि. नागपूर

४. जनमाहिती अधिकारी तथा संचालक (श्री अकरम मोहम्मद शेख)
स्वस्त धान्य दुकानधारक, वडगांव (गुजर)
ता. हिंगणा जि. नागपूर

५. जनमाहिती अधिकारी तथा संचालक (सौ. रेखाबाई विठ्ठलराव वैद्य)
स्वस्त धान्य दुकानधारक, देवळी (पेंढरी)
ता. हिंगणा जि. नागपूर

६. जनमाहिती अधिकारी तथा संचालक (श्री गोपीचंद चंद्रभानजी मुळे)
स्वस्त धान्य दुकानधारक, सालईदाभा
ता. हिंगणा जि. नागपूर

७. जनमाहिती अधिकारी तथा संचालक (श्री वामनराव निमजे)
स्वस्त धान्य दुकानधारक, गुमगांव
ता. हिंगणा जि. नागपूर

८. जनमाहिती अधिकारी तथा संचालक (श्री डी. व्ही. फुलकर)
स्वस्त धान्य दुकानधारक, कोतेवाडा
ता. हिंगणा जि. नागपूर

९. जनमाहिती अधिकारी तथा संचालक (श्री रवींद्र कान्हेरकर (कन्हेरे))
स्वस्त धान्य दुकानधारक, नेरी (मानकर)
ता. हिंगणा जि. नागपूर

१०. जनमाहिती अधिकारी तथा संचालक (श्री वासुदेव आदमने)
स्वस्त धान्य दुकानधारक, कान्होलीबारा
ता. हिंगणा जि. नागपूर

११. जनमाहिती अधिकारी तथा संचालक (श्री शिवराम गजबे)
स्वस्त धान्य दुकानधारक, हिंगणा (कसबा) व पिंपळधरा
ता. हिंगणा जि. नागपूर

१२. जनमाहिती अधिकारी तथा संचालक (श्री सुरेश मोहनलाल गुप्ता)
स्वस्त धान्य दुकानधारक, सावंगी
ता. हिंगणा जि. नागपूर

१३. जनमाहिती अधिकारी तथा संचालक (श्री नामदेव मसराम)
स्वस्त धान्य दुकानधारक, डेगमा (बुज)
ता. हिंगणा जि. नागपूर

१४. जनमाहिती अधिकारी तथा संचालक (श्री विजयसिंह राठोड)
स्वस्त धान्य दुकानधारक, येरणगांव
ता. हिंगणा जि. नागपूर

१५. जनमाहिती अधिकारी तथा संचालक (श्री भैय्याजी पराते)
स्वस्त धान्य दुकानधारक, वानाडोंगरी व राजीवनगर
ता. हिंगणा जि. नागपूर

१६. जनमाहिती अधिकारी तथा संचालक (सौ. शालीनी शंकरराव दारव्हेकर)
स्वस्त धान्य दुकानधारक, अडेगांव
ता. हिंगणा जि. नागपूर

## (आदेश पारित दिनांक ०४/०५/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २९/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये एकूण १४ द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२४/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०४/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. अपील क्र.१९१, १९२, १८९ मध्ये जनमाहिती अधिकारी तथा संचालक हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार हिंगणा हे हजर आहेत.

२. अपीलार्थीने मागितलेल्या सर्व अपीलांमध्ये माहितीचा विषय हा एकच असल्यामुळे आणि सदर प्रकरणी प्रथम अपीलीय अधिकारी हे देखील एकच आहेत. त्यामुळे सर्व १४ द्वितीय अपीलांची सुनावणी एकत्रीत घेण्यात आलेली आहे. अपीलार्थीने मागितलेल्या माहिती अर्जातील जनमाहिती अधिकारी हे वेगवेगळे आहेत. तसेच १२ अपीलांमध्ये अपीलार्थीने दि.२५/११/२०१० रोजी माहिती मागितलेली दिसते. मात्र अपील क्र. १९० आणि १९२ ची माहिती दि.१९/११/२०१० रोजी मागितलेली दिसते. आयोगापुढे आज सर्व स्वस्त धान्य दुकानदारांतर्फे ॲड.प्रदिप अग्रवाल यांनी बाजु मांडली आणि अपील क्र. १९० मध्ये ॲड. राठोड यांनी बाजु मांडली.

३. अपीलकर्ता हे आज आयोगापुढे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता येत नाही. मात्र उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, दि. ०१/०१/२०१० पासून दि.२५/११/२०१० पर्यंत सर्व स्वस्त धान्य दुकानातून राशन ग्राहकांना पुरवठा करण्यात आलेल्या सर्वच सामग्रीबद्दल सविस्तर माहिती अपीलार्थीने मागितलेली आहे.

४. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे उपस्थित असलेले ॲड. प्रदिप अग्रवाल आणि ॲड. राठोड यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याने १) सरकारी स्वस्त धान्य दुकान वडधामना नागलवाडी ता. हिंगणा जि. नागपूर, २) सरकारी स्वस्त धान्य दुकान देवळी (पेंढरी), ता. हिंगणा जि. नागपूर, ३) सरकारी स्वस्त धान्य दुकान वडगाव (गुजर), ४) सरकारी स्वस्त धान्य दुकान सालईदाभा, ५) सरकारी स्वस्त धान्य दुकान गुमगाव, ५)

सरकारी स्वस्त धान्य दुकान कोतेवाडा, ६) सरकारी स्वस्त धान्य दुकान कान्होलीबारा, ७) सरकारी स्वस्त धान्य दुकान नेरी (मानकर), ८) सरकारी स्वस्त धान्य दुकान हिंगणा व पिंपळधारा, ९) सरकारी स्वस्त धान्य दुकान सावंगी, १०) सरकारी स्वस्त धान्य दुकान डेगमा (बुज), ११) सरकारी स्वस्त धान्य दुकान वानाडोंगरी, १२) सरकारी स्वस्त धान्य दुकान येरणगाव, १३) सरकारी स्वस्त धान्य दुकान नागलवाडी, १४) सरकारी स्वस्त धान्य दुकान अडेगाव इ. गावातील स्वस्त धान्य दुकानांची माहिती मागितली असून सदर माहितीमध्ये प्रत्येक दुकानातून ग्राहकांना पुरवठा करण्यात आलेल्या सर्वस्वी सामग्री बद्दल सवीस्तर माहिती जसे तांदूळ, साखर, ज्वारी, तेल, दाळ इ. ची माहिती द्यावी असे नमूद करुन ग्राहकांकडून सामग्री बद्यलची रकमेच्या पावतीची झेरॉक्स प्रत देखील त्यांनी मागितलेली आहे. ॲड. अग्रवाल आणि ॲड. राठोड यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, स्वस्त धान्य दुकान चालविण्याचा परवाना ज्या दुकानदारांना देण्यात आला आहे ते माहितीच्या अधिकाराखाली जनमाहिती अधिकारी म्हणून घोषीत करण्यात आलेले नाहीत. म्हणून अपीलार्थीने थेट स्वस्त धान्य दुकानधारकांना जनमाहिती अधिकारी संबोधून माहिती अधिकाराचा अर्ज त्यांच्याकडे करणे हे नियमाला धरुन नाही. तसेच अपीलार्थीने मागितलेली माहिती हि दि.०१/०१/२०१० पासून दि.२५/११/२०१० पर्यंत मागितलेली आहे. मागितलेल्या माहितीमध्ये नेमकी अपीलार्थीस कोणती माहिती पाहिजे आहे याचा उल्लेख दिसून येत नाही. म्हणून मागितलेली माहिती ही मोघम स्वरुपाची आहे. तसेच अपीलार्थीने मागितलेल्या माहितीत कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नाही असेही वकीलांनी सुनावणीचेवेळी सांगितले.

तसेच प्रस्तुत प्रकरणी तहसिलदार हिंगणा यांचेकडे प्रथम अपील दाखल झाले होते. आणि या स्वस्त धान्य दुकानदारांवरती महसूल विभागाचे नियंत्रण आहे. म्हणून प्रथम अपीलाच्या सुनावणीस तहसिलदार हिंगणा यांच्याकडे वर नमूद केलेले सर्व स्वस्त धान्य दुकानदार उपस्थित होते. तहसिलदार हिंगणा यांनी सर्वांचे म्हणणे ऐकून घेऊन प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०२/०२/२०११ रोजी दिलेला आहे. आणि त्यामध्ये अपीलार्थीने स्वस्त धान्य दुकानदारांकडे माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी आणि भरणा केल्यानंतर ७ दिवसांचे आत अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी असेही नमूद केले आहे असेही आयोगापुढे वकीलांनी सांगितले. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता हे माहितीचे शुल्क भरण्यास कार्यालयात हजर झाले नाही म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे वरील दोनही वकीलांनी सुनावणीचेवेळी सांगितले. तथापी ॲड. राठोड यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. २५/११/२०१० चा माहितीचा अर्ज स्वस्त धान्य

दुकानधारक येरणागाव श्री विजयसिंग राठोड यांच्याकडे प्राप्त झाला नव्हता. तसेच स्वस्त धान्य दुकानदार हे जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले नाहीत त्यामुळे अपीलकर्त्याला जनमाहिती अधिकारी म्हणून स्वस्त धान्य दुकानदारांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे दोनही वकीलांनी आयोगापुढे सांगितले.

५. आज आयोगापुढे तहसिलदार हिंगणा, जि. नागपूर हे प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून हजर आहेत त्यांनी आयोगापुढे सांगितले की, वर नमूद केलेले स्वस्त धान्य दुकानाचे परवाना धारक यांना माहितीच्या अधिकाराखाली जनमाहिती अधिकारी म्हणून घोषीत केलेले नाही त्यामुळे अपीलकर्त्याने माहितीचा अर्ज परस्पर स्वस्त धान्य दुकानदारांकडे दाखल करणे योग्य नाही. तथापी या स्वस्त धान्य दुकानदार परवानाधारकांवर महसूल विभागाचे नियंत्रण असल्यामुळे तहसिलदार यांच्याकडे वर नमुद केलेले १४ स्वस्त धान्य दुकानदारांविरुध्द प्रथम अपील तहसिलदार यांच्याकडे दाखल केले. त्याची सुनावणी दि. १८/०१/२०११ आणि दि. ०२/०२/२०११ रोजी घेण्यात आली. त्यावेळी अपीलकर्ता व सर्व स्वस्त धान्य दुकानदार उपस्थित होते. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्ती ही मोठी असल्यामुळे अपीलार्थीस माहितीचे शुल्क भरणे आवश्यक आहे. ही बाब प्रथम अपीलाच्या सुनावणीचेवेळी अपीलार्थीच्या निदर्शनास आणून दिली. त्यावेळी अपीलार्थीने माहितीचे शुल्क भरण्याची तयारी दर्शविली. म्हणून दि.०२/०२/२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. आणि त्या निर्णयात अपीलार्थीस माहितीचे शुल्क भरुन माहिती घेऊन जाण्याचे निर्देश दिले. परंतू अपीलकर्ता हे माहिती घेण्यास आले नाहीत आणि शुल्क देखील भरले नाही म्हणून कोणतीही माहिती त्यांना देण्यात आली नाही.

६. प्रस्तुत प्रकरणी तहसिलदार हिंगणा तसेच ॲड. राठोड, ॲड. अग्रवाल यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीने वर नमूद केलेले १४ स्वस्त धान्य दुकानदार परवानाधारक यांचेबद्यल जी माहिती मागितलेली आहे तीचे शुल्क अपीलार्थीने भरुन माहिती प्राप्त करुन घेण्याचा तहसिलदार हिंगणा यांचा आदेश योग्य असल्याचे दिसून येते. म्हणून तहसिलदार हिंगणा यांच्या आदेशाप्रमाणे अपीलकर्ता यांनी माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करणे योग्य राहील म्हणून अपीलकर्ता यांची सर्व १४ अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे वर नमूद केलेले सर्व १४ अपीले हे अंशतः मंजूर करण्यात येत असून तहसिलदार हिंगणा यांनी दि.०२/०२/२०११ रोजी दिलेल्या प्रथम अपीलाच्या निर्णयात नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी सर्व संबंधित स्वस्त धान्य दुकान परवानाधारकांकडील माहितीसाठी तहसिलदार हिंगणा यांच्याकडे माहितीचे शुल्क भरावे. त्यासाठी तहसिलदार हिंगणा यांनी प्रत्येक दुकानदाराच्या माहितीचे शुल्क किती होईल याचा अंदाज घेऊन अपीलार्थीस माहितीचे शुल्क कळवावे आणि अपीलार्थीने शुल्क भरणा केल्यानंतर तहसिलदार हिंगणा यांनी अपीलार्थीस माहिती प्राप्त करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १९४/नाग/२०११**

१. श्री रविंद्र नत्थुजी तळेकर - **अपीलकर्ता**
मु. पो. मनसर
ता. रामटेक जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी - **उत्तरवादी**
पंचायत समिती रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव - **उत्तरवादी**
ग्राम पंचायत कार्यालय मनसर
ता. रामटेक जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक ०४/०५/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ३१/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२४/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०४/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत मनसर श्री वाय. आर. गायकवाड हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी यांच्या तर्फे विस्तार अधिकारी कृषी श्री एम. के. चितळकर हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.१०/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सरपंच / सचिव, ग्रामपंचायत मनसर यांच्याकडे शासनातर्फे मिळणारा ग्राम पंचायत आरोग्य विषयक मुक्त निधी रु.१०,०००/- चा वापर हा कोणत्या वर्षापासून होत आहे आणि सदर निधीचा वापर कोणत्या कामासाठी करण्यात आलेला आहे. तसेच शासनातर्फे जाहिर झालेल्या पत्रकाच्या आधारे अपात्र बी. पी. एल. लाभार्थ्यांमधून आपले नाव बी.पी. एल. यादीतून कमी करण्याचे धोरण जाहीर करण्यात आले होते. त्यामुळे अपात्र बी.पी.एल. धारकांमधून कमी केल्याबद्यल २ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

३.	जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या माहिती अर्जास अनुसरुन दि. १६/११/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामध्ये दारिद्रयरेषेखालील पत्रक ग्राम पंचायत परिक्षेत्रात वाटप करण्यात आले असून ३१ ऑक्टोबर २०१० पर्यंत अपात्र लाभार्थ्यांनी बी. पी. एल. मधून नाव कमी करण्यासाठी अर्ज ग्राम पंचायतीला दिला त्यांचेकडून कार्यवाही सुरु आहे असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झालेले दिसत नाही. म्हणून त्यांनी दि. २६/११/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी, पंचायत समिती रामटेक यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.	आज आयोगापुढे सुनावणीस अपीलकर्ता हजर नसल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी श्री गायकवाड हे सुनावणीस हजर असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीच्या माहिती अर्जास अनुसरुन दि. १६/११/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मुद्या क्र. १ च्या संदर्भात या ग्रामपंचायतला आरोग्य विषयक मुक्त निधी अद्याप प्राप्त झाला नाही तसेच मुद्या क्र. २ नुसार बी. पी. एल. बाबत १ ते १३ निकषाचे ३१ ऑक्टोबर २०१० पर्यंतचे अपात्र बी.पी.एल. लाभार्थ्यांनी स्वतःहून बी.पी.एल. यादीतून नाव कमी करुन अर्ज केल्याचे त्यासंबंधीचे परिपत्रक ग्राम पंचायत कार्यालय क्षेत्रात वाटले होते. व अपात्र लाभार्थ्यांवर ग्राम पंचायत रामटेक यांच्याकडून कार्यवाही सुरु आहे अशी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी श्री गायकवाड यांनी सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने

खंडविकास अधिकारी रामटेक यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. २०/१२/२०१० रोजी घेण्यात आली आणि निर्णय देण्यात आला. त्यामध्ये अपात्र बी.पी.एल. लाभार्थ्यांची माहिती पंचायत समितीकडून अपीलकर्त्यास पुरविण्यात यावी असे आदेश देण्यात आले. त्याला अनुसरुन दि. २५/०१/२०११ च्या पत्रान्वये खंडविकास अधिकारी, पंचायत समिती रामटेक यांच्या सहीने अपीलार्थीस मनसर ग्रामपंचायती अंतर्गत रॅण्डम पध्दतीने बी.पी.एल. यादीतून कमी करण्यात आलेल्या अपात्र लाभार्थ्यांची नावे अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली आहेत.

५. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि. १०/११/२०१० च्या माहिती अर्जाची माहिती जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी यांनी दि.१६/११/२०१० च्या पत्रान्वये आणि दि. २५/०१/२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १९३/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री जगन्नाथ बळवंतराव दलदले<br>अयोध्यानगर बस स्टॉप, न्यु सुभेदार रोड, गल्ली क्र.३,<br>अयोध्या नगर नागपूर<br>ता. जि. नागपूर - ४४० ०२४ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक<br>भूमी अभिलेख कार्यालय नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक<br>भूमी अभिलेख कार्यालय मौदा<br>ता. मौदा जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०४/०५/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ३१/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२४/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०४/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भूमि अभिलेख मौदा तर्फे जे. एच. चवरे, भूमापक हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख नागपूर तर्फे श्री पी. टी. भूते प्रमुख लिपीक हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.१३/०९/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक भूमि अभिलेख मौदा यांच्याकडे खसरा क्र. ११६ व ११७ ची मोजणी / मौका चौकशी बाबत १ ते १५ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे.

३.	जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय यांनी अपीलार्थीस माहिती अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. म्हणून त्यांनी दि. ०९/११/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. २०/१२/२०१० रोजी देण्यात आला असून सदरचे प्रथम अपील फेटाळले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. ३१/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी खसरा क्र. ११६ व ११७ ची मोजणी / मोका चौकशी बाबत माहिती मागितली होती. परंतू त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले मात्र प्रथम अपील फेटाळले गेले असे अपीलकर्ता यांनी सांगितले.

५.	जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भूमि अभिलेख नागपूर यांच्या तर्फे उपस्थित असलेले श्री भुते यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. १३/०९/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.१६/०९/२०१० ला प्राप्त झाला. तसेच अपीलार्थीने यापूर्वी देखील हीच माहिती मागितली होती आणि त्याला अनुसरुन अपीलार्थीस दि.२३/०७/२०१० रोजीच म्हणजे यापूर्वीच माहिती उपलब्ध करुन दिली होती. तथापी त्यानंतरही अपीलार्थीने पुन्हा हीच माहिती दि.१३/०९/२०१० च्या अर्जात मागितली म्हणून अपीलार्थीस पुन्हा दि.२९/०४/२०११ च्या पत्रान्वये १ ते १५ मुद्यांवर मुद्येनिहाय माहिती पोस्टाद्वारे पाठविलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्त्यास पोस्टाने माहिती पाठविल्यांचा पुरावा त्यांनी आयोगासमोर दाखविला.

६.	तसेच प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थीने दि. ०९/११/२०१० च्या अर्जान्वये प्रथम अपील दाखल केले होते आणि त्याचा निर्णय दि. २०/१२/२०१० रोजी देण्यात आला असून अपीलार्थीस २३/०७/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी माहिती यापूर्वीच उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे प्रथम अपील फेटाळले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

७. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, खसरा क्र. ११६ मधील दोन एकर जागेचा उपभोग श्री जितेन्द्र शंकरराव घुबे हे घेत असून खसरा क्र. ११६ चे शेतमालक मात्र श्री मुर्लीधर पतीराम कंगाली हे आहेत. तरी देखील श्री जितेन्द्र शंकरराव घुबे हे दोन एकर जागेचा उपभोग घेत आहेत. सदर जमीन ही आदिवासींची असल्यामुळे श्री घुबे यांनी या जमिनीचा उपभोग घेणे बेकायदेशीर आहे असे अपीलार्थीचे म्हणणे आहे. तथापी श्री घुबे हे खसरा क्र. ११६ मधील दोन एकर जागेचा उपभोग शेतमालक श्री मुर्लीधर पतीराम कंगाली यांच्या संमतीने घेत आहे. त्यांच्या दोघांमध्ये कोणत्याही प्रकारचा वाद नाही त्यामुळे जितेन्द्र शंकरराव घुबे घेत असलेल्या २ एकर जागेचा उपभोग अधिकृत किंवा अनधिकृत आहे या बाबतचा प्रश्न उदभवत नाही असे तहसिलदार मौदा यांनी अपीलार्थीस कळविले देखील आहे. तसेच सदरची बाब ही आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही म्हणून अपीलार्थीने योग्य त्या प्राधिकरणाकडे याबाबत दाद मागणे योग्य राहील. तसेच याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. २३/०७/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १९९/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री कवडू जनार्दन येनप्रेडीवार<br>मु. पो. मूल<br>ता. मूल जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय मूल<br>ता. मूल जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>तहसिल कार्यालय मूल<br>ता. मूल जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०९/०५/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२८/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तहसिल कार्यालय, मूल हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार मूल हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. ०१/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय मूल यांच्याकडे दि.१२/१२/२००८ ला जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर यांनी

तहसिलदार मुल यांना पत्र क्र.९३८ अतिक्रमण केलेल्या शेतकऱ्यांची यादी १ ते ३०६ पर्यंत जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना ३०६ लोकांचे नावासहित पाठविली होती. त्या पत्रावर पट्टे देण्याबाबत कोणती कार्यवाही झाली या बाबतची माहिती अपीलार्थीने मागितली आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दि.२९/११/२०१० च्या पत्रान्वये सदर माहिती जिल्हा कार्यालयाशी संबंधित असल्याने त्या कार्यालयास पत्रव्यवहार करण्याबाबत अपीलार्थीस कळविलेले आहे. त्यामुळे अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलार्थीने प्रथम अपील तहसिलदार मूल यांच्याकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी झाली नाही आणि निर्णयही त्यांना प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी दि.०४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी वर नमुद केल्याप्रमाणे त्यांच्या माहिती अर्जानुसार माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून दि. २६/११/२०१० रोजी तहसिलदार यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निकाली काढले त्यामुळे आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीचेवेळी सांगितले.

४. आजच्या सुनावणीस उत्तरवादी हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. परंतू प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्ता यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी दि.१२/१२/२००८ च्या पत्राने १ ते ३०६ शेतकऱ्यांमार्फत जमिनीवर अतिक्रमण केलेल्याची यादी तहसिलदार मूल यांच्याकडे पाठविलेलली आहे आणि त्या पत्रामध्ये पट्टे देण्याकरिता कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत. म्हणून अपीलार्थीने जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेकडील दि.१२/१२/२००८ च्या पत्राची प्रत व्यक्तीशः तहसिलदार मूल यांच्याकडे उपलब्ध करुन द्यावी. आणि सदरची प्रत अपीलकर्त्याकडून तहसिलदार मूल यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर तहसिलदार यांनी त्याबाबत योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेकडील दि. १२/१२/२००८ च्या पत्राची प्रत तहसिलदार मूल यांच्याकडे स्वतः उपलब्ध करुन द्यावी. आणि सदर पत्राची प्रत तहसिलदार मूल यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर तहसिलदार यांनी त्यावर योग्य ती कार्यवाही करावी आणि ती माहिती अपीलार्थीस १५ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र. २००/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शामदेव काशिरामजी तितरमारे<br>प्लॉट नं. २७०, चंदननगर, पो. हनुमाननगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर - ९ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त/पोलीस अधिक्षक<br>ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक<br>ॲन्टी करप्शन ब्यूरो, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०९/०५/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२८/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर श्री रॉय हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर श्री संदीप दिवाण हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांच्याकडे दि.१४/१२/२०१० रोजी लघुलेखक, वामन बाबाबराव तितरमारे

कार्यालय ग्रामीण पोलीस नागपूर यांचे विरुध्द ज्ञातस्त्रोतापेक्षा जास्त उत्पन्न असल्याबाबत दि.१४/१०/२०१० रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.२३/१२/२०१० च्या पत्रान्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (छ) अन्वये सदर प्रकरणात गुप्त चौकशी सुरु असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २४/१२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १७/०१/२०११ रोजी दिला असून जनमाहिती अधिकारी यांचे माहिती देता येणार नाही या मताशी सहमत असल्याचे नमूद करुन सदरचे प्रथम अपील अमान्य केल्याचे दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या माहिती अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही आणि माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (छ) अन्वये सदर प्रकरणात गुप्त चौकशी सुरु असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविले आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात देखील जनमाहिती अधिकारी यांचेशी सहमत असल्याने प्रथम अपील फेटाळले त्यामुळे जाणूनबुजुन माहिती देण्यात आली नाही म्हणून संबंधित अधिकाऱ्यांवर शास्तीची कार्यवाही करण्यात यावी असे अपीलार्थीने सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले.

४. आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहिती अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीस दि. २३/१२/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात चौकशी सुरु असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियमाचे कलम ८ (छ) नुसार माहिती देता येत नसल्याचे कळविले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. परंतू गुप्त चौकशी सुरु असल्यामुळे अपीलार्थीने मागितलेली माहिती आता देता येणार नाही अन्यथा त्याचा चौकशीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

५.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीने माहितीच्या अधिकाराखाली मागितलेली माहिती ही गुप्त स्वरुपाची दिसून येते. कारण प्रस्तुत प्रकरणात चौकशीचे काम सुरु आहे अदयाप चौकशीचे काम पूर्ण झाले नाही म्हणून सद्यस्थितीत माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होणार नाही. तथापी चौकशीचे काम पूर्ण झाल्यानंतर अपीलार्थीस त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणे योग्य होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी प्रस्तुत प्रकरणी चौकशीचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत केलेली कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.२०२ /नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कु. ज्योती सुदाम देशभ्रतार<br>४७, डॉ. आंबेडकर कॉलोनी, कामठी रोड, नागपूर<br>ता. जि. नागपूर -४४० ०१४ | - | **अपीलकर्ती** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव (परिक्षा)<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव (पुर्नमूल्यांकन)<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/०५/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२८/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहा. कुलसचिव, (पुर्नमुल्यांकन) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर श्रीमती संध्या चुनोडकर हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव (परिक्षा) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर श्री अनील हिरेखण हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, (पूर्नमुल्यांकन) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याकडे दि. २६/०२/२०१० ला केलेल्या

निवेदनाबाबत काय कार्यवाही केली त्याबाबत माहिती मागितलेली आहे. अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि. ०५/१०/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.१९/११/२०१० रोजी घेण्यात आली आणि सदर प्रथम अपील खारीज करण्यात आले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४/०२/२०११ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्तीने आयोगापुढे सांगितले की, त्यांनी हिवाळी २००९ परिक्षेत बी. एड. च्या अभ्यासक्रमाच्या पेपर क्र.३ परिक्षा क्र. ११४४८ च्या उत्तर पत्रिकेची छायांकित प्रती मागितल्या होत्या. तसेच उत्तरपत्रिका वेळेवर न दिल्यामुळे पुर्नमुल्यांकनासाठी अर्ज करता आला नाही त्यामुळे त्या वर्षातील अभ्यासक्रम पूर्ण झाला नाही. यासाठी दोषी असणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करण्यात यावी. म्हणून जनमाहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती परंतू जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहिती अर्जानुसार माहिती दिली नाही असे अपीलकर्तीचे म्हणणे आहे. त्यानंतर प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलानंतरही अपेक्षित माहिती मिळाली नाही असे अपीलकर्तीने आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा सहा. कुलसचिव, श्रीमती संध्या चुनोडकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्तीचा दि. १३/०५/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. १४/०५/२०१० रोजी प्राप्त झाला. त्याला अनुसरुन अपीलकर्तीस दि. २५/०५/२०१० च्या पत्रान्वये माहिती पुरविण्यात आली आहे. तसेच अपीलकर्तीने हिवाळी २००९ च्या परिक्षेत बी. एड. च्या अभ्यासक्रमाच्या पेपर क्र.३ परिक्षा क्र. ११४४८ च्या उत्तर पत्रिकेच्या छायांकित प्रती मागितल्या होत्या. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या कॉलेजच्या प्राचार्यांना उत्तर पत्रिकेची छायांकित प्रत अपीलार्थीस उपलब्ध होण्यासाठी पाठविली कारण विदयापीठ कोणत्याही विद्यार्थ्याला त्यांच्या उत्तरपत्रिकेची छांयाकित प्रत त्याच्या कॉलेजमार्फत देत असतात मात्र सदरच्या उत्तरपत्रिकेची प्रत कॉलेजला प्राप्त झाली नाही म्हणून कॉलेजने दि. १६/०८/२०१० च्या पत्रान्वये पुन्हा उत्तरपत्रिकेची प्रत अपीलार्थीस मिळवून देण्याकरिता विदयापीठास विनंती केली. त्यानुसार अपीलकर्तीस उत्तरपत्रिकेची प्रत पुन्हा उपलब्ध करुन दिली आणि सदरच्या उत्तरपत्रिकेची प्रत कॉलेजकडून दि.१९/१०/२०१० रोजी अपीलकर्तीस उपलब्ध

करुन दिली. सदरच्या उत्तरपत्रिकेची प्रत दि. १९/१०/२०१० ला अपीलकर्तीस प्राप्त झाल्याची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखल केली.

५. अपीलकर्ती तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीने मागितलेल्या माहितीप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी उत्तरपत्रिकेची प्रत उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्तीचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.२०१ /नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विजय अंबुभाई शेठ<br>येलो बिल्डींग रेलटोली गोंदिया<br>ता. जि. गोंदिया -४४१ ६१४ | - | **अपीलकर्ती** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक<br>सहकारी संस्था, गोंदिया<br>ता. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक<br>सहकारी संस्था, गोंदिया<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/०५/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.०४/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२८/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहा. निबंधक सहकारी संस्था, गोंदिया श्री डी. सी. नागरगोजे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, गोंदिया श्री संजय क्षीरसागर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. २२/०७/२०१० रोजी जिल्हा उपनिबंधक कार्यालय गोंदिया यांच्याकडे सहायक निबंधक सहकारी संस्था उपविभाग गोंदिया यांनी सन

१९७६ ते १९७७ आणि १९७७-७८ मध्ये जनता सहकारी बँक मर्या. गोंदिया यांच्या वसूली संबंधित सहकारी कायदा कलम १९६० च्या अंतर्गत कलम ९८ खाली दिलेल्या वसूली प्रमाणपत्रांची माहिती मागितली होती. परंतू त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपील जिल्हा उपनिबंधक गोंदिया यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्याचे सुनावणीचेवेळी सांगितले.

३. आज सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा सहायक निबंधक श्री नागरगोजे हे उपस्थित आहेत त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून दि.२९/०७/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही सुमारे ३५ वर्षापूर्वीची असल्यामुळे त्यांच्या कार्यालयात सदर माहितीचा शोध घेण्यात आला परंतू माहितीचा शोध घेऊनही माहिती मिळाली नाही म्हणून अपीलार्थीस दि. २७/०८/२०१० च्या पत्रान्वये सविस्तर माहिती देऊन कळविले की, आपण मागितलेली माहिती ही सन १९७६-१९७७ या वर्षातील असून सदर माहिती ही ३४ ते ३५ वर्षापूर्वीच्या कालावधीतील आहे. त्यामुळे आपण मागितलेली माहिती ही या कार्यालयात शोधली असता आढळून आली नाही असे अपीलार्थीस दि.२७/०८/२०१० च्या पत्रान्वये सविस्तरपणे कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने जिल्हा उपनिबंधक गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि अपीलार्थीने मागितलेली माहिती ही ३४-३५ वर्षपूर्वीची आहे त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांना शोध घेवूनही सदर माहिती उपलब्ध झाली नाही. परंतू माहिती अर्जातील मुद्या क्र.३ ज्या सहायक निबंधकांनी सन १९७६-१९७७ आणि १९७७-१९७८ मधील सहकारी कायदा कलम ९८ खाली सर्टिफिकेट दिलेले आहे त्या अधिकाऱ्यांचे नाव देण्याबाबत आदेश दिले असे श्री क्षिरसागर जिल्हा उपनिबंधक यांनी सांगितले. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्र. ३ ची माहिती अपीलार्थीस दि. १२/११/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिल्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही सुमारे ३५ वर्षापूर्वीची आहे त्या माहितीचा

शोध घेऊनही माहिती उपलब्ध झाली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्र. ३ ची माहिती दि.१२/११/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र इतर माहिती ही सुमारे ३५ वर्षापूर्वीची असल्यामुळे ती उपलब्ध होवू शकत नाही. म्हणून अपीलार्थीचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र.२१४ /नाग/२०११</u>**

१. श्री दशरथ कंठीराम कावरे - **अपीलकर्ता**
जुनी मंगळवारी, गुजरी चौक, नागपूर
ता. जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहायक संचालक - **उत्तरवादी**
नगर रचना विभाग, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता - **उत्तरवादी**
नगर रचना विभाग, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर

## (आदेश पारित दिनांक ११/०५/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि.०२/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३०/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, श्री भुते हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग म.न.पा. श्री गोस्वामी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. ०४/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग नागपूर यांच्याकडे मौजा वाठोडा येथील खसरा क्र. २७-४०/२-बी संबंधित टाऊन

प्लानिंग मॅप का मंजूर झाला नाही याबाबत माहिती मागितली होती त्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येत आहे याची माहिती मागितली होती. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दि.३०/११/२०१० च्या पत्रान्वये माहितीबाबत कळविले आहे. परंतू अपीलकर्ता यांना समाधानकारक माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि.०७/१२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२२/१२/२०१० रोजी देण्यात आला असून सदरचे प्रथम अपील निकाली काढले आहे त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांच्या तर्फे उपस्थित असलेले ॲड. ए. आर. यादव यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे वाठोडा खसरा क्र. २७-४०/- बाबत नकाशा संबंधित माहिती मागितली असता जनमाहिती अधिकारी यांनी अपेक्षित माहिती दिली नाही आणि येथील अभिन्यासाला तत्वतः मंजूरी देण्यात आली आहे. आणि आपण सादर केलेल्या नगर भूमापन विभागाचे मार्फत सिमांकन केलेल्या नकाशा संदर्भात मंजूरी विषयक कार्यवाही करण्यात येत आहे अशी माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. म्हणून प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलात जनमाहिती अधिकारी यांना अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याच्या सुचनेसह प्रथम अपील निकाली काढण्यात आले असे अपीलार्थीचे वकील यांनी आयोगापुढे सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, म.न.पा. श्री भुते यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. ०८/११/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्त्यास दि.३०/११/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या पत्रामध्ये मौजा वाठोडा खसरा क्र. २७, ४०/२ बी येथील अभिन्यासाला तत्वतः मंजुरी देण्यात आली आहे. आणि अर्जदाराने सादर केलेल्या नगर भुमापन विभागाचे मार्फत सिमांकन केलेला नकाशा संदर्भात मंजुरीविषयक कार्यवाही करण्यात येत असल्याचे नमूद करुन अपीलार्थीस कळविले असल्याचे जनमाहिती अधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच अपीलार्थीचे रेखांकन मंजूर न होणारी कारणे देखील जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. २०/१२/२०१० च्या पत्रान्वये कळविलेली आहेत त्यामुळे पून्हा दि.२०/१२/२०१० च्या पत्राची प्रत अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली असल्याचे त्यांनी सांगितले.

५.	प्रथम अपीलीय अधिकारी श्री गोस्वामी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचे प्रथम अपील त्यांच्या कार्यालयाकडे दाखल झाल्यानंतर त्याची सुनावणी दि.२२/१२/२०१० ला घेण्यात आली आणि निर्णय देण्यात आला. त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.३०/११/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे आणि अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध झाल्यामुळे तसेच दि.२०/१२/२०१० च्या पत्रात रेखांकन मंजूर न होण्याची कारणे  अपीलार्थीस कळविलेली आहेत. त्याची प्रत देखील प्रथम अपीलाच्या सुनावणीचेवेळी अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याने सदरचे प्रथम अपील निकाली काढण्यात आले.

६.	अपीलकर्ता यांचे वकील तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि.३०/११/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे तसेच अपीलार्थीस रेखांकन मंजूर न होण्याची कारण दर्शविणारे दि.२०/१२/२०१० चे पत्र देखील अपीलार्थीस उपलब्ध करुन दिले आहे. तसेच अपीलकर्त्यास परवानगी देण्याच्या कार्यवाहीची प्रक्रिया सुरु आहे ती कार्यवाही अंतिम झाल्यानंतर अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे  अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलार्थीस देण्यात येणाऱ्या परवानगीची कार्यवाही अंतिम झाल्यानंतर त्याची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.२१३ /नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मोईनुद्दीन सहाबुद्दीन ठेकेदार सादल<br>आशी नगर, मेनरोड, टेका, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहायक संचालक<br>नगर रचना विभाग, महानगर पालिका नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता<br>नगर रचना विभाग, महानगर पालिका नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ११/०५/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.०१/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३०/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, श्री भुते हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना विभाग म.न.पा. श्री गोस्वामी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. ०५/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता, नगर रचना विभाग, महानगर पालिका नागपूर यांच्याकडे हाजी अ. रहमान मा. याकुब म.न.पा. प्लॉट नं. ३१, आ, घर नं. ५८० सर्कल नं. ११/२३ नुसार मोमिनपुरा नागपूर यांच्या बांधकाम नकाशाला महानगर पालिकेने

मंजूरी दिली आहे. त्या प्रस्तावासोबत असलेल्या कागदपत्रांची मागणी त्यांनी केली होती. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांना दि. २९/१०/२०१० च्या पत्रान्वये श्री अब्दुल रहमान वल्द हाजी मोहम्मद याकुब, सर्कल नं. १७/२३ नकाशा इमारत परवाना आणि नकाशासोबत दिलेले विक्रीपत्र व इतर कागदपत्रे अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली आहेत. परंतू टॅक्स पावती आणि सिटी सर्व्हे यांची कागदपत्रे त्यांना मिळालेली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.०७/१२/२०१० रोजी घेण्यात येवून सदरचे प्रथम अपील निकाली काढले त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना त्यांनी वर नमूद केल्याप्रमाणे प्लॉट नं. ३१, आ, घर नं. ५८० सर्कल नं. ११/२३ नुसार मोमिनपुरा नागपूर च्या बांधकाम नकाशाला महानगर पालिकेने परवानगी दिली त्याबाबतची मंजूर नकाशाची आणि मालकी हक्का बाबतची माहिती मागितली होती. त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाले नाही म्हणून दि.२९/११/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०७/१२/२०१० रोजी देण्यात आला आणि अपीलार्थीस पूर्ण माहिती मिळाली असे प्रथम अपीलाच्या निर्णयात नमूद करुन प्रथम अपील निकाली काढले त्यामुळे आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलकर्त्याने सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता श्री भुते आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहायक संचालक श्री गोस्वामी हे आयोगापुढे सुनावणीस उपस्थित आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही सन १९६९ ते १९७६ पर्यंतची आहे म्हणून सदर नस्तींचा शोध अभिलेखकक्षात घेण्यात आला आणि त्यानंतर त्या नस्तीतील नकाशा प्रत, बिल्डिंग बांधकाम परवानगी प्रत आणि नस्तीतील इतर कागदपत्रे अपीलार्थीस दि.२९/१०/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली आहेत. मात्र त्यामध्ये टॅक्स पावती आणि सिटी सर्व्हेची कागदपत्रे दिसून आली नाही म्हणून ती कागदपत्रे अपीलकर्त्यास पुरविता आली नसल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच सदर नस्ती अपीलार्थीस देखील दाखविण्यात आली त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि त्यादिवशी देखील अपीलार्थीस पूर्ण माहिती उपलीब्ध करुन दिली

त्यामुळे अपील निकाली काढण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकतर्याने मागितलेल्या माहितीपैकी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाकडे जी कागदपत्रे उपलब्ध होती ती संपूर्ण कागदपत्रे अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहेत. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र.२१२/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री निळकंठ रामकृष्ण मेंढे<br>मु. पो. विरली बुज<br>ता. लाखांदूर जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत)<br>पंचायत समिती लाखांदूर<br>ता. लाखांदूर जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक<br>ग्रामपंचायत विरली बुज<br>ता. लाखांदूर जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ११/०५/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि.२९/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३०/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ११/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता आणि उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. १३/०९/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, विरली बुज, ग्रामपंचायत कार्यालय विरली, ता. लाखांदुर जि. भंडारा यांच्याकडे खाजगी नळधारकांना देण्यात येणाऱ्या नळ जोडणी बाबत एकूण १ ते ९ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत विरली, ता. लाखांदूर यांच्याकडे ग्रामपंचायतीमार्फत खाजगी नळधारकांना करण्यात येणाऱ्या पाणी पुरवठ्याबाबत आणि त्यांच्या दि. ०७/०४/२०१० च्या अर्जावर केलेल्या कार्यवाही संबंधित ९ मुद्यांवर मुद्येनिहाय माहिती मागितली होती त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी  उपलब्ध करुन दिलेली माहिती ही समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी दि.१४/१०/२०१० रोजी  प्रथम  अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.३०/११/२०१० रोजी देण्यात आला असून त्यामध्ये प्रथम अपीलाच्या सुनावणी दरम्यान झालेल्या चर्चेनुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले आहेत. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयाने समाधान झाले नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केल्याचे नमुद केले.

४.	आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्राम पंचायत विरली बुज ता. लाखांदूर हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत समिती लाखांदूर श्री कोमलवार हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१३/०९/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने एकूण १ ते ९ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपीलार्थीने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलार्थीस दि. ०६/१०/२०१० च्या पत्रान्वये त्यांनी मागणी केलेल्या ९ मुद्यांबाबत मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिली. त्यानंतर अपीलार्थीने विस्तार अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. ११/११/२०१० रोजी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.३०/११/२०१० रोजी देण्यात आला. त्यामध्ये असे नमूद केले की, मुद्या क्र. ३, ४, ५, ६, ८, ९ बाबत वस्तुनिष्ठ कार्यवृत्तांची सत्यप्रत देणे आवश्यक आहे. करिता जनमहिती अधिकारी यांना सुचना करण्यात येते की, अपील सुनावणीचे वेळी झालेल्या चर्चेनुसार माहिती पुरविण्यात यावी असे प्रथम अपीलाच्या निर्णयात नमूद केले आहे.

५.	प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्त्यास मुदतीच्या आत माहिती पुरविलेली आहे आणि पुरविलेल्या माहितीच्या संदर्भात असलेल्या कार्यवृत्तांतातील ठरावाची प्रत अपीलार्थीस देण्याच्या सुचना प्रथम अपीलाच्या निर्णयात देण्यात आली. त्याप्रमाणे प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी

दि.०६/१२/२०१० च्या पत्रान्वये कार्यवृत्तांताची झेरॉक्स प्रत तयार करुन अपीलार्थीस पाठविली आहे. परंतू अपीलार्थीने कार्यवृत्तांची झेरॉक्स प्रत घेतली नाही असे जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. परंतू याबाबत अपीलकर्त्याचे म्हणणे असे आहे की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांच्याकडून दि. ०६/१०/२०१० च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती प्राप्त झालेली आहे मात्र सदरची माहिती दिशाभूल करणारी आहे कारण ग्राम पंचायत मार्फत अद्यापही नळामार्फत होणारा पाणीपुरवठा गढूळ स्वरुपात होत आहे. तसेच त्यामुळे साथीच्या रोगाचा फैलाव गावात होत असतो तसेच गावातील लोकांना शुध्द पाणीपुरवठा होणे आवश्यक आहे असे अपीलार्थीने सांगितले. तसेच अपीलार्थीच्या दि. ०७/०४/२०१० च्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती देखील जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, ग्रामपंचायत रेकॉर्डला सदरचे घर अपीलार्थीच्या नावावर असल्यामुळे त्या घराचे कर दुसऱ्या इसमाकडून वसूल करणे शक्य नाही असे अपीलकर्त्यास कळविलेले आहे.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०६/१०/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक असलेली मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देखील कार्यवृत्तांताच्या झेरॉक्स प्रती तयार करुन अपीलार्थीस पाठविल्या होत्या. त्या त्यांनी स्विकृत केल्या नाही. तसेच अपीलाकर्त्याचे म्हणणे आहे की, गावाला ग्रामपंचायतीमार्फत होणारा पाणी पुरवठा हा गढूळ स्वरुपात होतो त्यामुळे गावात साथीच्या रोगाची लागवण होते त्यामुळे गावाला शुध्द पाणी पुरवठा होणे आवश्यक आहे. तथापी सदरची बाब ही आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही त्यासाठी अपीलार्थीने सक्षम प्राधिकरणाकडे शुध्द पाणी पुरवठयाबाबत दाद मागणे योग्य होईल. अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती उपलब्ध करुन दिल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# **आदेश**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.२३३/नाग/२०११</u>**

१. श्री अरुण सितारामजी कुचेवार - **अपीलकर्ता**
ज्ञानेश्वर नगर, वार्ड, नं. ९, आर्वी नाका, वर्धा
ता. जि. वर्धा

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी - **उत्तरवादी**
चामोर्शी
ता. चामोर्शी जि. गडचिरोली.

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
तालुका कृषी अधिकारी कार्यालय, चामोर्शी
ता. चामोर्शी जि. गडचिरोली.

**(आदेश पारित दिनांक १३/०५/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.०३/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०२/०४/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १३/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी, तथा कृषी अधिकारी श्री एम. एस. राऊत हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी श्री एन. जी. मंतलवाड हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. २०/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय चामोर्शी, जि. गडचिरोली यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसते.

१) श्री जी. एन. मंतलवाड, तालुका कृषी अधिकारी यांचे विरुध्द उपविभागीय कृषी अधिकारी गडचिरोली यांना अनधिकृत गैरहजर आहेत त्या पत्राची झेरॉक्स प्रत.

२) दि.०७/११/२०१० ला शासकीय कामकाज करण्यास मज्जाव केला त्याची प्रत.

३) वरिष्ठ कार्यालयाची दिशाभूल करुन कर्मचाऱ्यांना त्रास देणे.

४) दि.०१/१०/२०१० ते १७/१०/२०१० कमी वेतन दिले ते त्वरीत द्यावे. इ. स्वरुपाची निश्चित अर्थबोध न होणारी माहिती त्यांनी मागितलेली दिसते.

३. आज आयोगापुढे सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी हे हजर असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता हे तालुका कृषी अधिकारी चामोर्शी या कार्यालयात सहा. अधिक्षक या पदावर कार्यरत आहेत त्यांनी दि.२०/११/२०१० रोजी त्यांच्याकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर केला होता. मात्र सदरच्या अर्जात मागितलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची असून माहितीचा कोणताही अर्थबोध होत नाही परंतू त्यांनी मागितलेल्या माहिती पैकी ज्या माहितीचा बोध झाला त्याबाबतची माहिती तयार करण्यात आली आणि अपीलार्थीस ती माहिती दि.१४/१२/२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आली. सदर पत्र अपीलार्थीस डाकबुकमधून हस्तदेय दिले आहे. त्याची पोच आयोगापुढे जनमाहिती अधिकारी यांनी दाखविली. तसेच अपीलार्थीस दि. १४/१२/२०१० च्या पत्रान्वये असेही कळविले की, आपण मागितलेली वेतनाबाबतची माहिती आस्थापना शाखेशी संबंधित असल्यामुळे त्यांना त्याबाबत कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत असेही अपीलार्थीस कळविण्यात आले असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी श्री मंतलवाड यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलार्थीचा प्रथम अपीलाचा अर्ज हा विहीत नमुन्यात सादर केलेला नव्हता तसेच त्या अर्जावर रु.२०/- चा स्टॅम्प लावलेला नव्हता. म्हणून अपीलार्थीस दि.२१/०२/२०११ च्या पत्राने प्रथम अपील विहीत नमुन्यात करुन त्यावर रु.२०/- चा कोर्ट फी स्टॅम्प लावावा आणि पुन्हा अर्ज सादर करावा असे कळविले होते. मात्र अपीलार्थीने प्रथम

अपीलाच्या अर्जाची पूर्तता करुन दिलेली नाही त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय देता आला नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही संदिग्ध स्वरुपाची आहे तसेच त्यांना नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे याचा देखील अर्थबोध होत नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्ता हे सतत विना परवानगीने रजेवर जात असतात. त्यामुळे कार्यालयीन कामकाजाचा खोळंबा होत असतो. त्यामुळे त्यांच्या रजेच्या संदर्भात त्यांना सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याचा दाखला त्यांना मागितलेला आहे. मात्र तशाप्रकारची अपीलकर्त्याने कार्यवाही न करता कार्यालयाला त्रास देण्याच्या हेतुने माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांचे संबंधित माहिती मागत असतात. त्यामध्ये कोणते व्यापक जनहित नसून त्यांचे वैयक्तिक हित ते फक्त पाहत असतात. तसेच विना परवानगी रजा मंजूर करुन घेण्यासाठी दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. त्याला अनुसरुन अपीलार्थीने प्रथम अपीलीय अधिकारी यांना दि. २०/०४/२०११ रोजी देखील लेखी निवेदन दिले आहे. आणि त्यात माझी रजा मंजूर करुन देण्याचे मान्य केल्यामुळे माहिती अधिकाराखालील अर्ज मी मागे घेत आहे असे नमूद केले आहे. त्याचा पुरावा देखील प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केला. यावरुन असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि. १४/१२/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच इतर माहितीचा स्पष्टपणे बोध होत नाही त्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

P.T.O.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.२३२/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विनोद विश्वनाथ भोयर<br>श्री कृष्णराव अवताडे, पोलीस मुख्यालयासमोर, पटेल नगर, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त (विकास)<br>विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता<br>विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १३/०५/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.०७/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०२/०४/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १३/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, विकास शाखा, कार्यालय विभागीय आयुक्त नागपूर श्री अरुण पोहाणे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप आयुक्त (विकास) विभागीय आयुक्त नागपूर यांच्या वतीने श्री संजय डोंगरे कक्ष अधिकारी आयुक्तालय नागपूर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. २३/०८/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, विकास शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर यांच्याकडे अपीलार्थीने सादर केलेल्या प्रकरणावर विभागीय आयुक्त यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांना दिलेल्या निदेशाच्या पत्राची झेरॉक्स प्रत मागितलेली दिसून येते. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपेक्षेप्रमाणे माहिती दिली नाही म्हणून दि.१३/१२/२०१० रोजी उपआयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१३/०१/२०११ रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता (विकास) यांना अपीलार्थीस माहिती पुरविण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यात आली परंतू सदर माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि.०७/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या माहिती अर्जानुसार त्यांना दि. १३/१२/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली परंतू सदर माहिती ही समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, श्री अरुण पोहाणे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. २५/०८/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलार्थीने सादर केलेल्या प्रकरणावर विभागीय आयुक्त यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर यांना दिलेल्या निदेशाच्या पत्राची प्रत त्यांना पाहिजे होती. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरण्याबाबत दि.०३/०९/२०१० च्या पत्रान्वये कळविले त्यानुसार अपीलार्थीने माहितीच्या शुल्काचा दि.०७/१२/२०१० रोजी भरणा केला. आणि अपीलार्थीस दि.१३/१२/२०१० रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलार्थीस पुन्हा एकदा माहिती देण्याचे आदेश दिले त्यानुसार पून्हा अपीलकर्त्यास दि. १४/१/२०११ च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस मिळाल्याचे त्यांनी आयोगासमोर मान्य केले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# **आदेश**

१.  अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२.  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. २३४/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री गुलाब कान्हू बन्सोड<br>२१८, विनोबा नगर, तुमसर<br>ता. तुमसर जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक (रोहयो)<br>उपवनसंरक्षक, वनविभाग कार्यालय, भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी<br>वनक्षेत्र तुमसर<br>ता. तुमसर जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक १३/०५/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि.०९/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०२/०४/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १३/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनक्षेत्र अधिकारी, तुमसर श्री आशिर्वाद मेश्राम हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक (रोहयो) उपवनसंरक्षक वनविभाग कार्यालय भंडारा श्री के. के. शेंडे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. २५/०८/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र तुमसर यांच्याकडे श्री ए. एस. मेश्राम वपअ यांनी वैद्यकीय खर्चाची राशी, शासकीय/खाजगी रुग्णालयातून स्वतः व कुटुंबियांच्या नावाने किती रुपये उचलण्यात आले सन ०८/०८ ते ऑगस्ट २३/२०१० पर्यंत जानेवारी २०१० ते २३/०८/२०१० पर्यंत घेतलेल्या आकस्मिक /अर्जीत वैद्यकीय रजेचे विवरणाबाबतची माहिती मागितलेली दिसून येते.

३. आज आयोगापुढे सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत त्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक (रोहयो) हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याने मागितलेली श्री ए. एस. मेश्राम वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी वैद्यकीय खर्चाची राशी शासकीय / खाजगी स्वतः किंवा कुंटुंबियांकरिता किती उचल केली तसेच जानेवारी २०१० ते २३/०८/२०१० पर्यंतच्या आकस्मिक / अर्जीत वैद्यकीय रजेचे विवरण त्यांनी मागितले होते. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलार्थीस दि.१८/०९/२०१० च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क रु. २४४०/- भरण्याकरिता कळविण्यात आले. सदरचे पत्र अपीलकर्त्याने प्राप्त केल्याबाबत पोच सह जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केले. तसेच त्यामध्ये अपीलार्थीस माहितीचे शुल्क २४४०/- याबाबतचा सविस्तर तपशिलही कळविलेला होता. परंतू अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरले नाही त्यामुळे अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यांनतर अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. परंतू सदर अपील विलंबाने दाखल केल्यामुळे ते फेटाळण्यात आले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क रु. २४४०/- अद्याप भरणा केले नाही. तथापी त्यांनी माहितीच्या शुल्काचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे शुल्क भरणा करावे व अपीलार्थीने माहितीच्या शुल्काबाबत भरणा केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. २३५/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री गुलाब कान्हू बन्सोड<br>२१८, विनोबा नगर, तुमसर<br>ता. तुमसर जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक (रोहयो)<br>उपवनसंरक्षक, वनविभाग कार्यालय, भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी<br>वनक्षेत्र तुमसर<br>ता. तुमसर जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक १३/०५/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि.०३/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०२/०४/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १३/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनक्षेत्र तुमसर श्री आशिर्वाद मेश्राम हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक (रोहयो) उपवनसंरक्षक वनविभाग कार्यालय भंडारा श्री के. के. शेंडे हे हजर आहेत.

२.  अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. २५/०८/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी अंतर्गत गार्ड पदावर कार्यरत असलेले श्री चोपकर यांची दैनंदिनी मुख्यालय, व्हाऊचर्स लिहीणाऱ्यांचे नाव व पत्ता, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्ती बिलांची शासकीय/ खाजगी रुग्णालयातून किती राशी उचल केली त्याचे विवरण तसेच प्रवासभत्ता राशीची उचल केल्याचा महिना / वर्षनिहाय माहिती मागितलेली दिसून येते.

३.  आज आयोगापुढे सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत त्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक (रोहयो) हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी श्री मेश्राम यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याने श्री चोपकर यांच्याबाबत ते या कार्यालयात कोणत्या तारखेपासून आहेत तसेच कॅशबुक लिहीणाऱ्याचे नाव, पद, मुख्यालय, दैनदिनी, प्रवासभत्ता देयके वैद्यकीय बिले, खाजगी/ शासकीय कोषागाराचे टोकण इ. माहिती मागितली होती त्यानुसार अपीलार्थीस माहितीचे शुल्क २४४०/- भरण्याबाबत दि.१८/०९/२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. सदरचे पत्र अपीलार्थीस दिल्याबाबतची पोच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविली. परंतू अपीलार्थीने माहितीच्या शुल्काचा भरणा केला नाही. आणि त्यानंतर प्रथम अपील सहा. वनसंरक्षक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील हे मुदतीत दाखल केले नाही तसेच विलंबाने दाखल केले. विलंबाबाबत कोणतीही कारणमिमांसा दिली नाही म्हणून प्रथम अपील फेटाळले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

४.  जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीने मागितलेल्या माहिती बाबतचे शुल्क त्यांनी भरणा केले नाही म्हणून माहिती देण्यात आली नाही. तथापी अपीलार्थीने माहितीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे शुल्क भरणा करावे व अपीलार्थीने माहितीच्या शुल्काचा भरणा केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. २२७/नाग/२०११**

१. श्री हन्सु टोहली इडापाचे - **अपीलकर्ता**
रा. रमझान (घोटी)
ता. रामटेक जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी - **उत्तरवादी**
रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक २३/०५/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.०३/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०१/०४/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १२/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतू सदर दिवशी सुनावणी होवू शकली नाही म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सुनावणीची पुढील तारीख दि.२३/०५/२०११ देण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार रामटेक श्री एस. जी. समर्थ  हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री संगितराव हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. ०८/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय रामटेक, यांच्याकडे मौजा रमझान (घोटी) प.ह.नं. ३३ येथील शेती स. नं. ४/१ वर पक्षकार हन्सू जिवंत असतांना मयत दाखवून इतरांची नांवे दर्ज केल्याबद्यल तसेच सं.न. ६२, ७२/२, ९ चे अस्तित्व रेव्हेन्यु नकाशात असतांना देखील अस्तित्वात नसणे याबाबतची तक्रार स्वरुपात माहिती मागितलेली दिसून येते.

३. आज आयोगापुढे सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत त्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार रामटेक श्री समर्थ आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रामटेक श्री संगीतराव हे आयोगापुढे हजर असून त्यांनी सांगितले की, अपीलार्थीचा दि.०८/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मौजा ३३ चे सर्व्हे नं. ४/१ वर पक्षकार हंसू जिवंत असतांना मय्यत दाखवून इतरांची नावे दर्ज करण्याबाबतची माहिती तसेच सर्व्हे नं. ६२, आणि ७२/२, ९ चे अस्तित्व रेव्हेन्यू नकाशात असतांना देखील अस्तित्वात नसणे या संबंधित तक्रार स्वरुपात माहिती मागितली होती. त्याबाबत जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी अपीलार्थीस दि. ०६/११/२०१० च्या पत्रान्वये सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिली असून त्यामध्ये असे नमूद केले की, पक्षकार हंसू टोली इडापाचे हा इसम जिवंत असून त्याचे फेरफार क्र. ७ च्या नुसार दि. २९/०६/१९८२ च्या फेरफार हा श्री कांबळे तलाठी यांनी फेरफार पंजीत लिहीला मात्र फेरफार हा रुजु कोणत्या मंडळ अधिकाऱ्यांनी केला याबाबत फेरफार पंजीवर स्वाक्षरी अस्पष्ट असल्यामुळे मंडळ अधिकारी यांचे नाव सांगता येत नाही असे कळविले आणि त्या पत्रासोबत सर्व्हे नं. ४/१, ९, ६२, ७२/२ व २३चे ७/१२ चे उतारे आणि नकाशा त्याचे चतु:सिमा प्रमाणपत्र फेरफार क्र. ७ ची १९८२ फेरफार क्र. १९, ४४ चे दि.२४/०८/२००८ चे नक्कल प्रमाणपत्र इ. माहिती अपीलार्थीस स्पीड पोस्टाद्वारे अपीलार्थीच्या वतीने ॲड गायकवाड यांचेकडे पाठविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. उपविभागीय अधिकारी रामटेक श्री संगीतराव यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, प्रस्तुत प्रकरणात अपीलकर्ता यांची अशी तक्रार आहे की, त्यांना मय्यत दाखवून त्यांची शेत जमीन त्यांच्या मुलांच्या नावावर दरख्वास्त केली आहे. पंरतू प्रस्तुत प्रकरणात मूळ फेरफाराची नोंद वही पाहिली असता त्यामध्ये असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी रु. १०/- च्या स्टॅम्प पेपरवर सन १९८६ साली आपसी बटवारे (वाटणीपत्र) केले आहे

आणि त्या आधारावर अपीलकर्ता व त्यांच्या मुलाच्या नावावर या स्थावर मालमत्तेची नोंद झालेली आहे आणि त्या संदर्भातील सर्व कागदपत्रे अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहेत.

५. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली आहे. परंतू फेरफाराच्या संदर्भात ज्या मंडळ अधिकाऱ्यांनी हा फेरफार मंजूर केला आहे त्यांच्या कालावधीचा शोध घेऊन त्या मंडळ अधिकाऱ्याचे नाव अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी फेरफार ज्या मंडळ अधिकाऱ्याने मंजूर केला आहे त्याच्या कालावधीचा शोध घेऊन त्या कालावधीत कार्यरत असलेल्या मंडळ अधिकाऱ्याचे नाव अपीलार्थीस कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.१५५/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अजीज अब्दुल सुलतान धमानी<br>वार्ड क्र. १, प्रभात निकेतन, सुलेझरी<br>पो. ता. नागभिड जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>ब्रम्हपुरी<br>ता. ब्रमहपुरी जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय नागभिड<br>ता. नागभिड जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २३/०५/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि.२२/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०४/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतू सदर दिवशी सुनावणी होवू शकली नाही म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सुनावणीची पुढील तारीख दि.२३/०५/२०११ देण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार नागभिड श्री जी. एन. करलुके हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी श्री किशोर शंकरवार हजर आहेत.

२.  अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. २६/०७/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय नागभिड यांच्याकडे मौजा सुलेझरी येथील मालमत्तेचे खालीलप्रमाणे अपील प्रकरण उ. वि.अ. ब्रम्हपुरी यांचे कोर्टात सुरु होते. त्या आदेशाची प्रमाणित प्रत पुरविण्यात यावी अशी माहिती मागितलेली आहे.

१.  २९ /RRC/७१/९१-९२ दि. १७/०८/१९९७.

२.  ३०/RRC/७१/९१-९२ दि. १७/०७/१९९७.

३.  ३१/RRC/७१/९१-९२ दि.१७/०७/१९९७.

या तीन प्रकरणाबाबत उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी यांचे आदेश दि. १७/०७/१९९७ चे सत्यप्रतची प्रमाणित प्रत अपीलार्थीस मागितलेली आहे.

३.  जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या माहिती अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी उपविभागीय अधिाकरी, उपविभाग कार्यालय ब्रम्हपुरी यांचेकडे दि२१/१०/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२/११/२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्त्यास ७ दिवसांचे आत माहिती पुरविण्याचे आदेश दिले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे दि.२२/०१/२०११ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

४.  अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी हे माहिती देण्यास टाळाटाळ करतात. तसेच मागितलेल्या माहितीचे कागदपत्र न पुरविल्यामुळे होत असलेल्या नुकसान व त्रासाबद्यल जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवर दंड आकारण्यात यावा असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

५.  आज आयोगापुढे सुनावणीकरिता जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार श्री करलुके आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री किशोर वाघ हे उपस्थित आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२६/०७/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२९/०७/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही सुमारे २० वर्षापूर्वीची जुनी असल्यामुळे

त्याचा शोध घेऊनही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलार्थीस दि.२४/०८/२०१० च्या पत्रान्वये आपण मागितलेली माहिती ही सन १९९१-९२ या कालावधीतील असल्यामुळे त्याचा शोध सुरु असून सदर प्रकरण उपलब्ध झाल्यास आपणास त्वरीत पुरविता येईल असे नमूद करुन कळविण्यात आले असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात वर नमूद केलेले तीनही प्रकरणे दि.२४/०७/१९९७ रोजी तहसिलदार नागभिड यांच्या कार्यालयाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी परत केले आहेत असे त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या रेकॉर्डवरुन दिसून येते. त्यावर तहसिलदार नागभिड यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलार्थीस माहिती उपलब्ध व्हावी म्हणून त्या माहितीचा शोध घेण्यात आला आणि अद्यापही त्या माहितीचा शोध घेण्याचे काम सुरु आहे म्हणून अपीलार्थीस हव्या असलेल्या माहितीचा शोध घेऊन माहिती उपलब्ध झाल्यास ती विनामुल्य अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी मान्य केले.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही सन १९९१-९२ या कालावधीतील म्हणजेच २० वर्षापूर्वीची आहे. मात्र सदर माहिती अर्जाप्रमाणे तहसिलदार नागभिड यांचेकडे उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी यांनी २४/०७/१९९७ च्या पत्रान्वये प्रकरणे पाठविलेली असल्याचे दिसून येते. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी पुनश्च मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यासाठी एक शोध पथक तयार करुन त्या शोध पथकामार्फत या माहितीचा कसून शोध घ्यावा आणि माहिती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी किंवा माहिती उपलब्ध न झाल्यास तसे अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

P.T.O.

# आदेश

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर नायब तहसिलदार यांच्या नेतृत्वाखाली माहितीचा शोध घेण्यासाठी एक शोध पथक तयार करावे आणि त्या पथकाने माहितीचा कसून शोध घेऊन जनमाहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापी शोध घेऊनही माहिती उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य कळवावे.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.१५३/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अशोक यशवंतराव तुमराम<br>रा. मोहबाळा पो. चरुर खटी<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>वरोरा<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २३/०५/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि.२०/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१८/०३/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०४/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतू सदर दिवशी सुनावणी होवू शकली नाही म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सुनावणीची पुढील तारीख दि.२३/०५/२०११ देण्यात आली. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. ०२/०८/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वरोरा, ता वरोरा जि. चंद्रपूर यांच्याकडे जून २००९ ते जून २०१० या कालावधीतील निवासी

अकृषक परवानगी प्ररकणा संदर्भात परवानगी दिलेल्या प्रकरणाबाबत भखंड धारकाचे नाव व सर्व्हे नंबर बाबत माहिती मागितलेली आहे. तसेच राजस्व मामला क्र. १५७ दि. २६/०५/२०१० आणि राजस्व मामला क्र. १४९ दि.२२/०६/२०१० या दोनही प्रकरणांमध्ये अर्जदाराने सादर केलेल्या पुराव्याच्या प्रमाणित प्रती मिळण्याबाबत आणि पारित आदेशाची प्रमाणित प्रत मिळणेबाबतची माहिती मागितलेली आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी मागितलेल्या माहिती पैकी त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी निवासी अकृषक परवानगी प्रकरणा संबंधित माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच राजस्व मामला क्र. १५७ ची प्रमाणीत प्रत त्यांना मिळाली. मात्र राजस्व मामला क्र. १४९ ची प्रमाणीत प्रत त्यांना मिळाली नाही फक्त त्यांना छायांकित प्रत देण्यात आली. त्यामुळे प्रथम अपील दाखल केले प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही अपेक्षित माहिती मिळाली नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

४. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०२/०८/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. ०९/०८/२०१० ला प्राप्त झाला. अपीलार्थीने मागितलेली माहिती तयार करण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. ०३/०९/२०१० च्या पत्रान्वये माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविण्यात आले. परंतू अपीलकर्ता हे माहिती घेण्यास कार्यालयात आले नाही. त्यानंतर अपीलकर्ता दि. १८/०९/२०१० ला माहिती घेण्यासाठी कार्यालयात आले आणि त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यात आली. सदर माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे सुनावणीचेवेळी त्यांनी मान्य केले. मात्र राजस्व मामला क्र. १४९ दि. २२/०६/२०१० च्या आदेशाची प्रमाणित प्रत त्यांना मिळालेली नाही ती त्यांना आवश्यक असल्याचे अपीलकर्ता यांनी सांगितले. अपीलार्थीस यापूर्वीच राजस्व मामला क्र. १४९ ची छांयाकित प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलार्थीस या आदेशाची प्रमाणित प्रत देखील अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे जनमाहिती अधिकारी यांनी मान्य केले त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी राजस्व मामला क्र. १४९ ची प्रमाणित प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.२५८/नाग/२०११, २५९/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रामचंद्र क्रिष्णाजी मारटकर<br>रा. अमराई वार्ड मु. पो. राजुरा<br>ता. राजुरा जि. चंद्रपूर - ४४२९०५ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी<br>पंचायत समिती कार्यालय राजुरा<br>ता. राजुरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका<br>आदर्श मराठी प्राथमिक विद्या मंदिर, राजुरा<br>ता. राजुरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २७/०५/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि.१८/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये अपील क्र.२५८/२०११ आणि अपील क्र. २५९/२०११ अशी दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२१/०४/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २७/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, आदर्श मराठी प्राथमिक शाळा मंदिर राजुरा यांच्या तर्फे ॲड. डी. आर. वरघने हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती राजुरा श्री के. एस. चौधरी हे हजर आहेत.

२. **<u>अपील क्र. २५८/२०११</u> -** अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका आदर्श मराठी प्राथमिक विद्या मंदिर राजुरा यांच्या वतीने उपस्थित असलेले ॲड वरघने यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने दि. २१/०९/२०१० चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती राजुरा यांचेकडे दाखल केला होता सदरचा अर्ज पंचायत समिती राजुरा यांचेकडून जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचेकडे दि. २४/०९/२०१० रोजी प्राप्त झाला. सदरच्या माहितीच्या अर्जात अपीलार्थीने बालविद्या शिक्षण प्रसारक मंडळ राजुरा या संस्थे अंर्तगत सुरु असलेल्या आदर्श मराठी प्राथमिक शाळेशी संबंधित असलेली सन १९९९ ते २००५ या कालावधीतील माहिती मागितली होती. त्यामध्ये प्रामुख्याने शाळेत शिक्षकवृंद हजेरी नुसार प्रत्येक शैक्षणिक क्षेत्रात किती शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती त्याबाबत शिक्षकांच्या नावासह त्यांनी लेखी माहिती मागितली होती. अपीलार्थीने मागितलेली माहिती संकलीत करण्यात आली आणि अपीलार्थीस माहितीचे शुल्क रु.३६६/- भरण्याबाबत दि.२२/१०/२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले आणि सदरचे पत्र दि. २३/१०/२०१० रोजी रजिस्टर पोस्टाने पाठविले आणि ते पत्र अर्जदाराला दि.२५/१०/२०१० रोजी प्राप्त झाले होते. परंतू अपीलार्थीने माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून त्यांना ३० दिवसात माहिती देता आली नाही, त्यानंतर अपीलकर्त्याने दि. ०२/११/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.३/१२/२०१० रोजी देण्यात येवून त्यामध्ये अपीलार्थीस माहिती पुरविणेबाबत कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने दि. ०४/०५/२०११ च्या पत्रान्वये शाळेकडे माहितीचे शुल्क मनिऑर्डर द्वारे पाठविले. सदरचे शुल्क दि. ०७/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाले. त्यानंतर अपीलार्थीस मुख्याध्यापिका यांनी माहितीचे शुल्क भरल्यानंतर दि. २३/०५/२०११ ला आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असे ॲड वरघने यांनी सांगितले. तसेच दि.२३/०५/२०११ च्या पत्राद्वारे अपीलकर्त्यास रजिस्टर पोस्टाने संपूर्ण माहिती पाठविल्याबाबत ॲड. श्री वरघने यांनी आयोगापुढे पुरावा सादर केला.

४. **<u>अपील क्र. २५९/२०११</u> -** अपीलकर्ता यांनी दि. १३/०९/२०१० च्या माहितीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे बालविद्या शिक्षण प्रसारक मंडळ राजुरा रजि. न.२१४६ या संस्थे अंतर्गत चालणाऱ्या आदर्श म. प्रा. विद्या मंदिर राजुरा या शाळेची सन २००९-२०१० मधील माहिती मागितलेली आहे. त्यामध्ये सदर शाळेस जिल्हा परिषदेने किती वर्गाची परवानगी दिली आहे तसेच प्रत्येक वर्गाच्या तुकडयांच्या परवानगीबाबत शिक्षण

विभागाकडून शिक्षकांच्या वेतनाकरिता मिळत असलेल्या शासकीय अनुदानाची माहिती आणि शिक्षकांच्या बाबतची माहिती मागितलेली आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, आदर्श मराठी प्राथ. विद्यामंदिर राजुरा यांनी दि. २२/१०/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहितीकरिता माहितीचे शुल्क रु. ८०/- चा भरणा करणेबाबत कळविले होते. त्यानंतर अपीलार्थीने दि.०३/०५/२०११ रोजी माहितीचे शुल्क भरले. आणि अपीलार्थीस दि.२३/०५/२०११ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. त्यानंतर अपीलार्थीने दि.०२/११/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.०३/१२/२०१० रोजी देण्यात आला आणि त्यामध्ये अपीलार्थीस संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलार्थीस दि.२३/०५/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. आणि त्याबाबतचा पुरावा देखील आयोगासमोर ॲड. वरघने यांनी सादर केला.

५. जनमाहिती अधिकारी यांच्या तर्फे उपस्थित असलेले ॲड. वरघने यांनी सादर केलेल्या विवेचनावरुन असे दिसून येते की, अपीलार्थीस आवश्यक असलेली संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील क्र. २५८/२०११ आणि २५९/२०११ ही दोनही अपीले खारीज करण्यास पात्र आहेत.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.२६१/नाग/२०११</u>**

१. श्री चंद्रभान चिंधूजी बन्सोड - **अपीलकर्ता**
डॉ. बाबासाहेब आम्बेडकर कॉलनी, सावनेर ०४
ता. सावनेर जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक ३०/०५/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२७/०४/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार, सावनेर श्री व. ग. पट्टलवार हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, सावनेर हे शासकीय कामामुळे हजर राहू शकले नाही म्हणून त्यांच्या वतीने नायब तहसिलदार श्री व्ही. आर. दरबे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०५/०८/२०१० रोजी माहिती अधिकाराखाली जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार सावनेर यांचेकडे अर्ज सादर करुन पुरवठा विभागातील सध्या कार्यरत कनिष्ठ लिपीक सौ जे. सी. वर्मा या कार्यभार सांभाळत आहेत त्या नियुक्त झाल्यापासून तालुका पुरवठा विभागाकडे वरिष्ठ कार्यालयाकडून किती शिधा पत्रिका मिळाल्या व किती वाटप करण्यात आल्या त्याबाबतची माहिती मागितली होती. तसेच रोजच्या दैनंदिन नोंदवहीत आवक-जावक व्यवस्थित हाताळले न जाता खोडतोड का होते आणि सदर कनिष्ठ लिपीक सौ वर्मा यांची नागरिकांशी वर्तणूक बरोबर नाही त्या माहिती देण्यास नेहमीच टाळाटाळ करित असतात असे अपीलार्थीने आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. आणि यासंबंधित तहसिलदार यांचेकडे तक्रार केली परंतू त्यांच्याकडून अपेक्षित उत्तर मिळाले नाही म्हणून प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात माहिती पुरविण्यासंबंधी स्पष्टपणे नमुद केल्यानंतरही माहिती देण्यात आली नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहितीत झालेल्या विलंबाबद्यल त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्यात यावी अशी अपीलार्थीने मागणी केली.

३. विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री पट्टलवार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यावेळी तात्कालीन जनमाहिती अधिकारी श्री अरुण मावळे यांनी दि.२१/०८/२०१० च्या पत्रान्वये पुरवठा विभागाचे निरिक्षण अधिकारी यांचेकडे सदरचा अर्ज त्यांच्या विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांना दि.२१/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती पुरविण्याबाबत हस्तांतरीत करण्यात आला. त्यावेळी तात्कालीन निरिक्षण अधिकारी श्री चापले हे कार्यरत होते ते दि. ३१/१०/२०१० रोजी सेवानिवृत्त झाले म्हणून तात्कालीन जनमाहिती अधिकारी श्री अरुण मावळे यांनी दि. ०५/१०/२०१० रोजी कनिष्ठ लिपीक सौ वर्मा यांना पत्र पाठवून माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळविले. त्याला अनुसरुन कनिष्ठ लिपीक सौ. वर्मा यांनी दि. ०५/१०/२०१० च्या पत्रान्वये श्री मावळे तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती पाठविल्याचे दिसून येते. परंतू श्री मावळे यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर अपीलार्थीने तहसिलदार सावनेर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०९/११/२०१० रोजी देण्यात आला आणि त्या निर्णयात जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस ३० दिवसात विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले. त्याला अनुसरुन तात्कालीन जनमाहिती अधिकारी श्री मावळे यांनी अपीलार्थीस दि. ०७/१२/२०१० च्या पत्रान्वये शिधा पत्रिका वाटपाबाबत अर्ज केलेल्यांची यादी उपलब्ध करुन दिली.

सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने सांगितले. मात्र वरिष्ठ कार्यालयाकडून एकूण किती शिधा पत्रिका वाटप केले गेले याची सांख्यिकी माहिती त्यांना मिळाली नाही असे सांगितले आणि दि. ०७/१२/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्यामुळे तात्कालीन जनमाहिती अधिकारी श्री मावळे यांचेविरुध्द कार्यवाही करावी असे अपीलार्थीने सांगितले.

४. नायब तहसिलदार तथा विद्यमान जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने हजर असलेले त्यांचे प्रतिनिधी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्यास शिधा पत्रीका वाटपा बाबतची सांख्यिकी माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. अपीलार्थीच्या दि.०५/०८/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दि.०७/१२/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणजे सुमारे ४ महिने विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणून सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्यास तात्कालीन जनमाहिती अधिकारी श्री मावळे हे दोषी आढळून येतात म्हणून त्यांचेविरुध्द माहितीच्या अधिकारान्वये कार्यवाही करणेबाबतचा खुलासा मागविणे आवश्यक आहे. म्हणून अपीलार्थीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस शिधा पत्रिका वाटपाबाबत सांख्यिकी माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलार्थीस तात्कालीन जनमाहिती अधिकारी श्री अरुण मावळे यांनी वर नमुद केल्याप्रमाणे सुमारे ४ महिने विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (२) अन्वये त्यांचेविरुध्द शिस्त भंगाच्या कार्यवाहीची शिफारस का करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे १५ दिवसांचे आत सादर करावा.

३. विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार सावनेर यांनी या निर्णयाची प्रत श्री अरुण मावळे तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांचेकडे खुलासा सादर करण्यासाठी पाठवावी.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र.२६२/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री चंद्रभान चिंधूजी बन्सोड<br>डॉ. बाबासाहेब आम्बेडकर कॉलनी, सावनेर ०४<br>ता. सावनेर जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक<br>राज्य उत्पादन शुल्क नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक<br>राज्य उत्पादन शुल्क नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ३०/०५/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२७/०४/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क नागपूर श्री सी. आर. वाघ हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क नागपूर श्री एस. जे. धोटे हे उपस्थित आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, दारुबंदी व उत्पादन शुल्क, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर यांचेकडे दि. १०/०८/२०१० ला माहितीच्या अर्जान्वये नगर परिषद स्लॉटर हाऊस जवळील बुध्द मुर्ती जवळ असलेल्या पनघट दारु बारच्या परवानगी विषयी माहिती मागितलेली आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०८/०९/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू सदर माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि. १६/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. २७/१०/२०१० रोजी देण्यात आला असून त्यामध्ये अपीलार्थीस योग्य माहिती उपलब्ध झालेली आहे असे नमूद करुन सदरचे प्रथम अपील निकाली काढण्यात आले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, पणघट दारु बार जवळ अवघ्या १५ मिटरच्या अंतरावर भगवान बुध्दांची मुर्ती आहे व धार्मिक स्थळापासून १५० मिटरच्या गोलार्धात दारुविक्रीची परवानगी नसावी असे शासकीय नियम असतांना त्या बारला कोणत्या नियामांच्या आधारे परवानगी दिली तसेच त्या बारबद्यल योग्य ती कार्यवाही करावी असे अपीलार्थीने सांगितले. तसेच याबाबत जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागितली असता सुस्पष्ट माहिती न दिल्यामुळे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपील निकाली काढण्यात आल्यामुळे समाधान झाले नाही म्हणून आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलार्थीने सांगितले.

४.	जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क नागपूर श्री वाघ यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१०/०८/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. १६/०८/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलार्थीच्या माहितीच्या अर्जानुसार नगर पालिकेच्या स्लॉटर हाऊस जवळील बुध्दमुर्ती शेजारी पणघट दारुच्या बारची परवानगी बाबतची माहिती  त्यांनी मागितली होती. त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दि.०८/०९/२०१० च्या पत्रान्वये पणघट बारला मिळालेल्या परवानगीची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. आणि हॉटेल पणघट बार या दुकानास अनुज्ञप्ती मंजुरी पूर्वी प्राप्त विभागीय अहवालानुसार सदर स्थळ नियमातील तरतुदीनुसार अंर्तनिर्बंधमुक्त असल्याचे अभिलेखावरुन दिसून येते व मुंबई विदेशी मद्य अधिनियम १९५३ चे नियम ४५ (१) (क) मधील तरतुदीनुसार प्रस्तावीत परवाना कक्षापासून ७५ मिटरच्या आत नोंदणीकृत धार्मिक/शैक्षणिक

संस्था नसावी अशी स्पष्ट तरतुद आहे. आणि सदर नियमातील संबंधित पृष्ठाची प्रत देखील अपीलार्थीस पुरविण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक श्री धोटे यांनी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचे प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल झाल्यानंतर दि.१२/१०/२०१० आणि दि. २१/१०/२०१० ला सुनावणी निश्चित करण्यात आली. परंतू दोनही वेळच्या सुनावणीस अपीलार्थी हे गैरहजर राहिले. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.०८/०९/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याने सदरचे प्रथम अपील फेटाळण्यात आले.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. ०८/०९/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली आहे. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे म्हणणे असे आहे की, सदरच्या बारला दारुविक्रीचे दिलेले लायसन्स हे बेकायदेशीर आहे. तथापी सदर बारला दिलेल्या दारुदुकानाच्या लायसन्स विरुध्द अपीलार्थीने सक्षम अधिकाऱ्यांकडे अपील दाखल करणे योग्य राहील. कारण सदरची बाब ही आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. तथापी अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्त्याचे प्रथम अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

P.T.O.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.२६०/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शरद दिनकरराव पाचखेडे<br>श्री कृष्णराव अवताडे, पोलीस मुख्यालयासमोर पटेल नगर, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव<br>पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग<br>मंत्रालय, मुंबई-३२ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव<br>पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग<br>मंत्रालय, मुंबई-३२ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ३०/०५/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२७/०४/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, पाणी पुरवठा व स्वछता विभाग, मंत्रालय, मुंबई श्री दुर्वे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव, पाणी पुरवठा व स्वछता विभाग मंत्रालय मुंबई श्रीमती सुनीता कोळेकर हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मुंबई यांचेकडे दि.१५/११/२०१० ला माहितीच्या अर्जान्वये चौकशी अधिकारी श्री मेश्राम वरीष्ठ भुवैज्ञानिक भंडारा यांना बदलुन द्यावे व इतर मुद्यांवर कार्यवाही व्हावी या करता मी वरिष्ठ भुवैज्ञानिक भू.स.वि.यं. चंद्रपूर यांचे मार्फत तात्कालीन सचिव ग्राम

विकास विभाग मुंबई यांना दि.२९/१२/९२ ला पत्र दिले त्या पत्रावर शासनातर्फे संचालक भू.स.वि.यं. पूणे यांना दि. ०१/०३/९३ व ३१/०५/९३ ला पत्र देण्यात आले असतांना संचालक भू.स.वि.यं.पूणे यांनी दि.१४/०७/९३ ला शासनाकडे उत्तर सादर केले तरी संचालक भू.स.वि.यं. पूणे व माझे दि.२९/१२/९२ चे पत्रावर तात्कालीन कक्ष अधिकारी यांनी सचिवांकडे काय टिपणी सादर केली त्या टिपणीची झेरॉक्स प्रत देण्यात यावी तसेच सचिवांचे आदेशानुसार काय कार्यवाही झाली याबाबत माझ्या नावाने पत्रची सुध्दा झेरॉक्स प्रत देण्यात यावी अशी माहिती मागितलेली आहे. माहितीचा कालावधी १९९२ ते ३१-१०-२०१० नमूद केला असून फौजदारी कारवाई करण्याकरिता माहिती हवी असून माहितीसाठी लागणारा संपूर्ण खर्च शासनाच्या नियमानुसार देण्यास तयार असल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दि. २६/११/२०१० च्या पत्रान्वये माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामुळे पुरविता येत नाही असे कळविलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि.०६/१२/१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही. म्हणून दि.०७/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी दि.२६/११/२०१० च्या पत्रान्वये जी माहिती दिलेली आहे ती खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलाच्या सुनावणीकरिता उपस्थित राहू शकत नसल्यामुळे दि.१८/०१/२०११ ला अपीलीय अधिकारी यांना पत्र दिले तसेच सदर माहिती उच्चतम न्यायालय दिल्ली येथे सादर करावयाची असल्यामुळे ती माहिती दि.३१/०१/२०११ चे आत द्यावी अशी विनंती केली असतांनाही माहिती प्राप्त झाली नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

४. जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव श्री दुर्वे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही १९९२-९३ या वर्षातील म्हणजेच १९ वर्षापूर्वीची आहे. तसेच अपीलार्थीने जी माहिती मागितलेली आहे त्यावेळी ही माहिती शासनाच्या ग्राम विकास विभागाशी संबंधित आहे. त्यानंतर सन १९९६ मध्ये पाणी पवुरवठा व स्वच्छता विभाग हा वेगळा झाला. शासनाच्या कागदपत्रांच्या अभिलेख वर्गिकरणाच्या प्रचलीत पध्दतीनुसार अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचे प्रकरण हे 'क' वर्गात मोडत असल्यामुळे आणि ते दप्तरी दाखल झाले असल्यामुळे तसेच वर्गिकरणाचा कालावधी संपल्याने ती कागदपत्रे नष्ट देखील करण्यात आली असावी परंतू अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचा पुन्हा शोध घेण्यात आला मात्र माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलार्थीस

दि. २६/११/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध नाही असे कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले.

५. अपीलार्थीने प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केले. उपसचिवांनी प्रथम अपीलाची सुनावणी दि.२०/०१/२०११ रोजी घेतली. मात्र सदर सुनावणीस अपीलार्थी हे गैरहजर राहिले. परंतू त्यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिला नाही म्हणून भविष्यात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय द्यावा अशी सक्त ताकीद त्यांना देण्यात येत आहे.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही सुमारे १९ वर्षापूर्वीची असून सदरच्या माहितीचा शोध घेऊनही ती माहिती जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात आढळून आली नाही. आणि त्याबाबत दि.२६/११/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस कळविण्यात आले आहे त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.२७२/नाग/२०११</u>**

१. श्री अरुण विठ्ठलपुरी वैकुंठी - **अपीलकर्ता**
प्लॉट नं.५८, बँक कॉलोनी, दुर्गा नगर, मानेवाडा रोड, नागपूर
ता. जि. नागपूर - ४४००२४

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक - **उत्तरवादी**
गोसावी हायस्कुल लिंगा
ता. कळमेश्वर जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक ३१/०५/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १०/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२८/०४/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३१/०५/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गोसावी हायस्कुल लिंगा ता. कळमेश्वर हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर श्री बी. बी. पाटील हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. ०६/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गोसावी हायस्कुल, लिंगा ता. कळमेश्वर, जिल्हा नागपूर यांच्याकडे गोसावी हायस्कुल लिंगा येथील

शाळेचे पटांगण व खोल्या भाडयाने दिल्यापासून झालेल्या उतपन्नाबाबत ची माहिती मागितलेली आहे माहितीचा कालावधी जानेवारी ते डिसेंबर २००९ आणि जानेवारी ते स्टेंबर २०१० असा नमूद केलेला आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. १६/१०/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. पंरतू सदर माहिती ही चुकीची असल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. २६/१०/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही परंतू दि.०६/१२/२०१० अन्वये अपीलार्थीचे प्रथम अपील नस्तीबध्द करण्यात आले आहे त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. १०/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, गोसावी हायस्कुल लिंगा ता. कळमेश्वर ह्या शाळेच्या खोल्या आणि शाळेचे पटांगण जानेवारी २००९ ते सप्टेंबर २०१० या कालावधीत खाजगी कामाकरिता, प्रामुख्याने लग्नसमारंभाकरिता भाडयाने देण्यात आले होते. भाडेवसूलीपासून मिळालेली रक्कम बँकेच्या ज्या खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे त्या जमा खात्यांची नावे मागितली होती. जनमाहिती अधिकारी यांनी दि.१६/१०/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू सदर माहिती ही खोटी व दिशाभूल करणारी असून वस्तुस्थिती दडवून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले. अपीलकर्ता यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, दि. ०९/०४/२०१०, दि.२१/०५/२०१० आणि दि.२८/०५/२०१०, दि.३०/०५/२०१० या तारखांना या शाळेमध्ये विवाह झालेले आहे त्या बाबतच्या लग्नपत्रिका त्यांनी त्यांच्या अपील अर्जात जोडलेल्या आहेत त्यानंतर त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी यांचेकडे दाखल केले मात्र प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही आणि प्रकरण नस्तीबध्द करण्यात आले असे अपीलार्थीने सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी दि.१६/१०/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते. अपीलकर्ता यांचे प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद यांचेकडे दाखल झाले होते त्या संदर्भात उपशिक्षणाधिकारी यांचेसमोर सुनावणी घेण्यात आली परंतू

अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कोणताही निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून निर्गमित झालेला नाही असे अपीलार्थीने सांगितले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद नागपूर हे आयोगापुढे हजर असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही मुख्याध्यापकांच्या स्तरावरील असल्यामुळे मुख्याध्यापकांनी अपीलार्थीस दि. १६/१०/२०१० च्या पत्रान्वये माहिती दिलेली असल्यामुळे प्रकरण नस्तीबध्द करण्यात आले.

५. अपीलकर्ता तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीने मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी दि. १६/१०/२०१० च्या पत्रान्वये शाळेचे पटांगण किंवा खोल्या खाजगी कार्यक्रमांसाठी देण्याकरिता त्यांनी मौखीक किंवा लेखी कोणतीही परवानगी दिलेली नाही त्यामुळे किती भाडे वसूल करण्यात आले याची माहिती देता येत नाही असे कळविले आहे. मात्र अपीलकर्त्याने सदरच्या शाळेच्या पटांगणावर वर नमूद केल्याप्रमाणे विवाहस्थळ हे या शाळेचे पटांगण दाखविलेले आहे म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा) जिलहा परिषद नागपूर यांनी प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन त्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपीलार्थीस व आयोगास एक महिन्याच्या मुदतीत सादर करावा त्याकरिता अपीलार्थीचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (मा) जिल्हा परिषद नागपूर यांनी वर नमूद केल्याप्रमणे चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपीलकर्ता व आयोगाकडे सादर करावा.

PTO

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र..............दिनांक.................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**